
१०३३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १०५५

# ांची कविता



REFBK-0004930

प्रकाशक

श्री. तुकाराम पुंडलीक शेट्ये
पुस्तकांचे प्रकाशक व व्यापारी.

माधवबाग : : मुंबई

कि. १॥ रु.

REFBK-0004930

REFBK-0004930

# अनुक्रमणिका



| | |
|---|---|
| आभारांची ओंजळ ................ | |
| प्रस्तावना | १–१६ |
| अर्पणपत्रिका .................. | |
| रसिकाप्रत | १७ |
| सोन्याची द्वारका | १८ |
| भविष्यास ! | १९ |
| मधोमध नांवच पडली फशीं | २१ |
| जगच जगे हृदयांना चुरडुन | २२ |
| सावकारा ! | २३ |
| हे धना ! | २४ |
| कलेप्रत | २५ |
| मराठेशाहींतील एक प्रसंग | २६ |
| कशाला मागें बघसी वळून | ३१ |
| हरिजन | [illegible] |
| कुणि कांहिं म्हणो | [illegible] |
| शब्दांनो ! | ३५ |
| आग पहा लागली | ३६ |
| म्हणा तर | ३८ |
| असें जग हें माहेर उपेक्षेचें | ३९ |
| पोपट आणि मैना | ४० |
| एकवार वाटे कीं | ४१ |
| मज वेड लागलें | ४२ |
| ह्या जगताची धांव पुढें | ४३ |
| देवी आशे ! | ४४ |
| एके काळीं | ४५ |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष उभा बेडर हा चोर | ४६ |
| अज्ञातास | ४७ |
| तरी अंतरिं मी पांखरूं उदास | ४९ |
| वसंत | ५० |
| गडे सुधे ! | ५१ |
| खबूतरा ! | ५३ |
| बाळा अशोका ! | ५५ |
| येणार घटीं ज्या | ५६ |
| महात्मा | ५७ |
| नवें वर्ष | ५८ |
| कविता | ५९ |
| त्यानें मग फेंकून | ६० |
| हीच ती लढाई | ६१ |
| विनवणी | ६३ |
| मायभूमी | ६४ |
| घ्या राया वंदन | ६५ |
| सरदार धन्य एवढा | ६७ |
| नवलाख झुले लष्कर | ६८ |
| कालचा मराठा | ६९ |
| आजचा मराठा | ७१ |
| उद्यांचा मराठा | ७३ |
| शांति आणि संपत्ति | ७४ |
| कुठें जाशी ? | ७५ |
| हिरकणी | ७६ |
| तिचे बाबा | ७७ |
| पर्वती | ७९ |

| | |
|---|---|
| गु. अण्णा कर्वे | ८१ |
| शेवंतीचें फूल | ८२ |
| उघड उघड | ८३ |
| उलटल्या उरांत कटयारी | ८५ |
| चौघडा | ८६ |
| कोकिळे ! | ८८ |
| बाळ पांखरा ! | ९० |
| माझी वेल | ९२ |
| महात्मा | ९४ |
| भविष्य ये जन्मास | ९५ |
| जशी वृत्ती त्या फूलपांखराची | ९६ |
| फेका फेका भाला | ९७ |
| मैना | १०० |
| कमला | १०१ |
| प्रतापराव | १०२ |
| गोदातटीं | १०३ |
| आपलें निशाण | १०४ |
| चंद्रावरील डाग | १०५ |
| स्वर्गाहुनी सुंदर | १०६ |
| हृदय मिळे हृदया न जरी | १०७ |
| कु. कुंदा रानडे | १०८ |
| कु. विजया कर्वे | १०९ |
| चढण | ११० |
| गांधीजी | १११ |
| बाहुलीचें लगीन | ११२ |
| निशाणासाठीं | ११३ |
| हे हृदया माझ्या | ११४ |

| | |
|---|---|
| माझें फूल | ११५ |
| कु. सुचरिता बापट | ११६ |
| स्वैर वावडी | ११७ |
| माझ्या जगा | ११८ |
| घरीं ये नविनच हा पाहुणा | ११९ |
| ऊठ अतां हे हृदया | १२० |
| उमर खयाम | १२१ |
| नकळत तूं | १२३ |
| अर्थहीन गाशी तूं | १२४ |
| बघ वृक्षापोटीं | १२५ |
| उदासीन | १२६ |
| मकर संक्रांत | १२७ |
| संध्याकाळ | १२८ |
| ज्यांना म्हणतों आपण अपुले | १२९ |
| कोट हिऱ्यांचें तेज इथें | १३१ |
| परक्या देशांतील गृहस्था ! | १३२ |
| अस्त्रलास वेसण खाशी | १३३ |
| जगांत जर कां असेल कांहीं | १३४ |
| पढवुं तरी तुजसि किती | १३५ |
| द्वाड मनी | १३६ |
| देवापाशीं गरिबाचें मागणें | १३७ |
| भ्रमरा ! भ्रमण तुझें अनिवार | १३८ |
| आगरकर | १४० |
| कल्पने ! | १४१ |
| हीं फुलें मुलें मज | १४३ |
| म्याक्स्विनी | १४४ |

| | |
|---|---|
| रसज्ञ संपादका ! | १४५ |
| जित ! | १४६ |
| खडकीची लढाई | १४८ |
| हे तृष्णे ! | १५० |
| सयाजीराव महाराज | १५२ |
| प्रभु सृष्टीचा रंगारी | १५३ |
| लोकमान्य | १५५ |
| जीवना ! | १५६ |
| सगळेच चहुंकडे | १५७ |
| उत्सव प्रिय हें जग | १५८ |
| पिंजारी | १५९ |
| कागदा ! | १६१ |
| पुणें दरबारीं | १६२ |
| निःस्पृहता | १६४ |
| आकाशदिवा | १६५ |
| दारिद्य उरावर | १६६ |
| श्री. भास्करराव तांबे यांस— | १६७ |
| महादजींचें ग्वाल्हेर | १६८ |
| आई | १६९ |
| बांधितों घरें अपुलीं | १७० |
| उंच उंच उंचावर | १७२ |
| प्रभु ! तुझे न अंतरले कधिं पाय | १७३ |
| कवितेप्रत ! | १७५ |



# आभारांची ओंजळ

मराठी ग्रंथ संग्रहालय

महाराष्ट्रावरच्या प्रेमामुळें व भक्तीमुळें मी जीं गाणीं गुणगुणूं शकलों तीं व इतर कांहीं आज या पुस्तकांत घेतलीं आहेत. जेव्हां जेव्हां बाहेरच्या जगांतील काव्य, माझ्यापुरतें नष्ट व्हावें तेव्हां तेव्हां, आमच्या घरांतील बंधूंच्या गोजिऱ्या बाळांनीं माझ्या हृदयांत काव्य जागाविलें व फुलविलें. अशीं किती तरी कवनें या संग्रहांत आहेत कीं, या मुलांच्यामुळें लाभलेलीं स्फूर्तींचीं पळें त्यांवर तरंगतांना मला आजही दिसतात. या माझ्या चालत्या बोलत्या नक्षत्रांची या वेळीं आठवण होणें उचितच होय व तिचा निर्देश करणें हें माझें कर्तव्यही आहे.

त्याचप्रमाणें माझ्या दिवंगत पित्याची जागा ज्यांनीं कांहीं अंशीं भरून काढली व रूक्ष आणि रखरखीत अशा व्यावहारिक जगाची झळ मला लागूं दिली नाहीं, ते माझे वडील बंधु ती० आप्पा, यांचेही आभार मी मानीत आहें.

माझ्या वृद्ध मातेस हें पुस्तक छापलेलें पाहून फार आनंद होईल तो यापुढें तसाच जन्मभर जोपासून उपभोगणें यांतच मी त्याची सर्व सार्थकता मानितों.

आधुनिक काव्याचे नवयुगप्रवर्तक, ज्येष्ठ व श्रेष्ठ कवि भास्कर रामचंद्र तांबे यांनीं या संग्रहास प्रस्तावना लिहून मजवर मोठेंच उपकार करून ठेविले आहेत. उतार वयांत त्यांनीं माझ्यासाठीं फार दगदग सोसली असेंच मला वाटतें. या त्यांच्या उपकाराचें ओझें डोईवर अभिमानानें वागविण्यांत मला भूषण आहे.

प्रस्तुत कवनें मी छापावीं म्हणून ज्यांनीं प्रेमानें निकड लाविली ते माझे जिवलग स्नेही श्री. केशवकुमार, अरविंद, यशवंत, गिरीश, अधिकारी, ह. स. गोखले, प्रो. बेहरे, प्रो. बापट, प्रो. पोतदार, प्रो. रानडे, नाटककार स. अ. शुक्ल, भास्करराव विद्वांस, माझे सहाध्यायी रसिक मित्र पु. बा. कुळकर्णी, बा. त्रिं. दामले व डॉ. बाबासाहेब देशपांडे या सर्वांचे मी मुक्तकंठानें आभार मानितों. त्याचप्रमाणें मजवर अहेतुक प्रेम करणारे माझे कै. कविमित्र अनंततनय यांची मला अश्रुपूर्ण आठवण होत आहे.

श्री. तुकाराम पुंडलीक शेटये यांनीं व्यवहारदुर्लभ असें प्रकाशनाचें काम स्वतः अंगावर घेऊन उत्तम प्रकारें केलें, हें त्यांस भूषणावह आहे व याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. त्याचप्रमाणें महाराष्ट्र-भाषाभूषण श्री. आजगांवकर यांनीं पुस्तक व्याकरणदृष्ट्या शुद्ध व्हावें म्हणून फार मेहनत घेतली व केळकर आर्टिस्ट यांनीं सुंदर चित्रें काढून दिलीं. श्री. देसाई व त्यांचें मेहनती सहकारी मंडळ यांनीं जिवापाड मेहनत घेऊन छपाईचें काम मनाप्रमाणें करून दिलें म्हणून मी या सर्वांचा फार आभारी आहें.

आभार-उपकारांची निरवानिरव झाली.

या वेळीं माझे बाबा जर असते तर, त्यांनीं आपला प्रेमळ हात पाठीवर फिरविला असता—व आनंदपूर्ण दृष्टीनें पाहिलें असतें—पण आतां त्याचें काय ?

‘ शांतिकुंज ’<br>पुणें शहर<br>१९३३

अज्ञातवासी

# प्रस्तावना

संस्कृत नाटकांत पडदा उंच होतांच, पहिला प्रवेश सूत्रधाराचा असतो. त्याबरोबर एखाद दुसरा पारिपार्श्वक असतो. हें मंडळ आरंभाला ईश-स्तवन करतें. ही नांदी आटोपली म्हणजे पारिपार्श्वक जातात व सूत्रधार तेवढा बाकी राहतो. या सूत्रधाराचें कार्य काय? साहित्य-शास्त्रकारांनीं ह्या प्रश्नाचीं निरनिराळीं उत्तरें दिलीं असतील, पण त्याशीं आपल्याला तूर्त कांहीं करावयाचें नाहीं. मला ह्यांतील एक हेतु असा दिसतो कीं सूत्रधाराचें मुख्य कर्तव्य वाटाड्याचें आहे. उपस्थित झालेल्या प्रेक्षकांस, नाटकांतील कल्पनामय जगांत नेऊन पोंचवावें ह्यासाठीं साहित्य-शास्त्रकारांनीं ही योजना करून ठेवलेली आहे. प्रेक्षकवर्ग मीठभाकरीचें खडतर कार्य करण्यांत व्यापृत असतो. ऐहिक सांसारिक यातना, विवंचना इत्यादींनीं गांजलेला असतो. ह्या प्रत्यक्ष संसृतीचें दडपण इतकें अजस्र असतें कीं, त्याच्या मगरमिठींतून प्रेक्षकाला सोडवून, कल्पनामय नंदनवनांत नेऊन, तेथें विहार करण्याची मनःस्थिति त्याचे ठायीं उत्पन्न करून देणें, त्याच्या मनाची तयारी, स्वर्ग, मृत्यु, पाताळांत भराऱ्या घेण्यासारखी करून देणें, हें अतिशय कठीण काम सूत्रधारास करावयाचें असतें. प्रत्यक्ष जग खडतर, दुःखमय, कष्टमय, छलछद्मानें व्यापिलेलें, तर कवीचें कल्पनामय जग पुण्यमय, निष्कंटक, अलौकिक आनंदाचें आगर असतें. ह्या दोन्ही मनःस्थितींमध्यें उत्तर दक्षिण ध्रुवाचें अंतर. तेव्हां, प्रत्यक्ष अशा जगांतून कल्पनामय अशा जगांत प्रेक्षकांचें संक्रमण करून देणें ही सामान्य गोष्ट नव्हे. हें कठिण काम सूत्रधार करीत असतो. तो अचानक, न कळूं देतां, प्रेक्षकाला नंदनवनांत खेंचून नेतो, स्वर्गाचीं द्वारें उघडतो. नंदनवनाच्या दारापर्यंतचा मार्ग सुखावह होईल, रमणीय होईल, अशी योजना करण्यांत,

त्याचें मन गुंतून गेलेलें असतें. तो संगीताच्या निरनिराळ्या आंबराया आणि फुलवाड्या उभ्या करून त्यांतून प्रेक्षकाला नेत असतो. आणि त्याच्या काळजा-वरील ओझें कमी करीत, अकस्मात् प्रेक्षकाच्या ध्यानीं येऊं न देतां त्यास या कल्पनामय वातारणांत नेऊन सोडतो.

तवास्मिन् गीत रागेण हरिणा प्रसभंकृतः

एष राजेव दुष्यंतः सारंगेनाति हंभसाः ॥

ह्या श्लोकांतील पहिले चरण अशा वेळच्या प्रेक्षकांच्या मनःस्थितीचे द्योतक होत, ह्याप्रमाणें सूत्रधार नंदनवनाच्या द्वारापर्यंतचा मार्ग सुखावह करण्यांत जरी आपली सारी करामत खर्च करीत असतो, तरीदेखील नाटकांतील कल्पनामय जगाची, सूत्रधाराच्या ह्या प्रत्यक्ष जगांतील कृतीला बरोबरी करितां येणार नाहीं. प्रत्यक्ष जग तें प्रत्यक्ष जगच; आणि कल्पनामय जग तें कल्पनामय जगच ! पहिला मृत्युलोक तर दुसरा स्वर्गलोक. पहिला भुताटकीचा बाजार तर दुसरा जादूनें भारलेला अद्भुतरम्य प्रदेश. दोघांची बरोबरी कशी होईल ?

मला वाटतें कीं, प्रस्तावना-लेखकाची स्थिति अशीच असते. कोठें कवीची कल्पनामय, भावनामय कृति आणि कोठें प्रस्तावनाकाराची रूक्ष रसचर्चा ! वाचकांची मनःप्रवृत्ति रसग्रहणास अनुकूल करून द्यावी इतकेंच प्रस्तावनाकाराचें कार्य. ' शुभमंगल सावधान ' होईपावेतों मात्र मध्यस्थाची गरज, नंतर ह्या इतरे-जनाला कोण पुसतो ? पति-पत्नींचा एकजीव झाल्यावर त्यांना वऱ्हाडी लोकांचें स्मरण देखील रहात नाहीं ! माझे पुणें येथील कविमित्र दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ अज्ञातवासी यांच्या यापुढील काव्यरूपी रम्योद्यानांत एकदां का वाचक प्रविष्ट झाला म्हणजे त्यास मजसारख्या प्रस्तावनालेखकाचा विसर पड-ल्यावांचून राहणारच नाहीं. तथापि या मानाच्या पानाची मी अपेक्षा केल्यास अस्थानीं होणार नाहीं खास; आणि हा योग कवींनीं आणून दिला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

मला वाटतें, अज्ञातवासी यांना काव्यरसाची बाळघुटीच आहे. कांहीं वर्षां-मागें मी पुण्यास गेलों असतां, त्यांच्या घरीं भोजनास गेलों होतों. त्या वेळचें तेथील दृश्य माझ्या डोळ्यांसमोर अजूनही तरंगतें आहे. अज्ञातवासी हे

घरीं आले नव्हते. तेव्हां त्यांच्या प्रातःस्मरणीय व पितृतुल्य अशा वृद्ध वडिलांनीं अत्यंत प्रेमानें माझें मनापासून स्वागत केलें. मी त्यांचेजवळ जाऊन बसलों. त्यांनीं माझ्या खांद्यावर हात ठेवले आणि कोणताही उपचार न ठेवितां ते सहजासहजीं उद्गारले. ‘ तुम्हीं आलां, माझ्या डोळ्यांना दिसलां, फार समाधान झालें. तांबे ! मी तुमचें काव्य पाहिलें आहे ’—नंतर आधुनिक कवितेची उत्क्रांति कसकशी होत गेली याचें त्यांनीं मोजक्या शब्दांत आलोचन केलें. तें ऐकून मी तर अगदीं थक्कच होऊन गेलों. त्यांचा तो छपरी पलंग होता त्यावर त्यांनीं आपलें वार्धक्यानें जर्जर झालेलें शरीर अंमळसें टाकिलें. पण, लगेच ते उठून बसले व मजकडे अत्यंत प्रेमळपणानें पुन्हां पाहून म्हणाले. ‘ तांबे ! तुम्ही मजकडे आलां हें पाहून मला जो आनंद होत आहे तो मी कसा सांगूं ? इतक्यांतच बाळ येईल. तो तुमची नीट बडदास्त करील. इतकेंदेखील आतां माझ्यानें होत नाहीं ’—असें म्हणून पुन्हां त्यांनीं पलंगावर अंग टाकिलें. त्यांचें तें प्रेमळ वर्तन व त्यांचे ते साहित्यविषयक उद्गार पाहून व ऐकून मला काय वाटलें याची कल्पनाच करावी. अनेक विचार विजेसारखे माझ्या मनांत येऊन गेले. ज्या पुरुषानें सारा जन्म व्यावहारिक कर्तव्यांत घालविला त्याला साहित्याचें इतकें मार्मिक अवलोकन करावयास वेळ कसा मिळाला असेल याचें मला सकौतुक आश्चर्य वाटलें व त्यांचेविषयींची माझी भक्ति दृढतर झाली. तात्पर्य काय कीं, प्रस्तुत कवीचे ठायीं काव्यरति व साहित्याबद्दल उमाळा आनुवंशिक आहे असें मला वाटतें.

दुसरी ठळक गोष्ट माझ्या दृष्टीस येते ती ही कीं प्रस्तुत कवि हा अस्सल जातिवंत मराठा आहे. महाराष्ट्रमातेचें दूध त्याचे नसांनसांतून भरलें आहे. तिच्या उरास्कंधावर तो यथासुख वाढलेला दिसतो. लडिवाळपणानें तिच्या मांडीवर लोळावें, तिच्या सुखानें सुखी व्हावें, दुःखानें कष्टी व्हावें, तिच्या श्वासाला श्वास द्यावा, अश्रूला अश्रु द्यावा हेंच त्याचें जीवन होय. तिच्या भूतकाळांत तो रंगून जातो, तिचें गतवैभव, तिचा गौरव, तिचें सामर्थ्य यांचीं अत्यंत रम्य चित्रें त्याच्या डोळ्यांसमोर अगदीं स्पष्ट उभीं असतात. चौघडा झडत असतांना, तिचे मर्द फांकडे गडावर चढत असतां, कवीला आपल्या डोळ्यांसमोर स्पष्ट दिसतात व अशीं रमणीय चित्रें तो जेव्हां नवलपूर्ण

उमटवितो, तेव्हां वाचकदेखील आनंदानें डोलूं लागल्यास नवल नाहीं. जेव्हां मराठ्यांचें 'नवलाख लष्कर' झुलत असतांना त्यांना दिसतें, त्यांचे भाले तळपतांना जेव्हां दिसतात, पानिपतावर पुण्यपत्तनेश्वर रोखून चाललेले जेव्हां ते बघतात व 'हर हर महादेव' अशी गर्जना त्यांच्या कानावर येते, तेव्हां त्यांचे बाहु खचित स्फुरत असतील, अंगरख्याचे बंद तटातट तुटत असतील असें मला वाटतें. व हीं त्यांच्या डोळ्यांसमोर हमेश तरंगणारीं अपूर्व चित्रें ते जेव्हां आपल्या मोहक शब्दांनीं रेखाटूं लागतात, तेव्हां तीं वाचून मजसारखा म्हातारादेखील ताडकन् उठून नव्या उमेदीनें उभा राहतो व त्याचप्रमाणें इतरांनाही असेंच होईल यांत कांहीं संदेह नाहीं. हें आम्हां महाराष्ट्रीयांचें गत वैभव कवींनीं आमच्या डोळ्यांसमोर उभें केल्यावर, कोण असा मराठा असेल कीं ज्याचें रक्त एकदम उसळूं लागणार नाहीं, व ज्याचे अंगावर रोमांच उभे राहणार नाहींत व जो आपला वर्तमान काळ विसरून तत्काळ भूतकाळांत प्रवेश करणार नाहीं ?

**वांकती थोर सरदार**<br>
**दिल्लिचे वीर**<br>
**पुणें दरबारीं, तळपती तिखट तवारी.**

\+ + +

**केवढी पुण्याची भीति**<br>
**पहा कांपती**<br>
**चळचळा वैरी, तळपती तिखट तवारी**

हें गतकालचें उठावदार चित्र, हें आम्हां मराठ्यांचें वैभव, कवीनें आपल्या कुंचल्यानें आमच्यासमोर रेखाटतांच जर मराठ्याचा हात मिशीवर गेला नाहीं तर तो मराठाच नव्हे, दोगलाच म्हणावयाचा. आम्ही मराठे एकदां कसे होतों हें ज्याचे मनांत वागेल, तोच आम्ही पुन्हां एकदा कसे होऊं याची कल्पना करूं शकेल. आमच्या आजच्या 'अश्रूंचीं फुलें' कशीं होतील हें एकट्या त्यालाच केवळ दिसूं शकेल. आम्हीं मराठे आहों ही जाणीव ज्याची बुजली तो आम्हांस मेला व आम्ही त्याला मुकलों. हा महाराष्ट्रमातेविषयींचा जाज्वल्य अभिमान, खरी तळमळ, खरा जिव्हाळा प्रस्तुत काव्यांत जिकडे तिकडे रसरस-

लेला दिसतो. हीं गत वैभवाचीं चित्रें पाहून, मराठ्यांचा दरारा डोळ्यांसमोर उभा राहून, मराठ्यांचा जरिपटका प्रत्यक्ष तळपतांना पाहून, मोठमोठाल्या विदेशी बादशाहांचे सरदार दरखदार मान तुकवीत आहेत, हें पाहून जर कवीला महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचीं स्वप्नें पडूं लागलीं तर काय नवल ? ही कवीची केवळ अनिश्चित आशाच आहे असें नाहीं तर त्याच्या मनावर असा ठाम पगडा बसला आहे कीं भरतभूमीचा पुन्हां जयजयकार व्हावयाचा असेल तर तो आम्हां मराठ्यांच्या हातूनच होणार. मीदेखील 'तथास्तु' म्हणतों, नव्हे, मला या उतारवयांत असें निश्चित वाटूं लागतें कीं हिंदभूमीचा सूर्यनारायण उदयास येणार असेल तर तो सह्याद्रीवरच येईल. आणि हिंदभूमींतील इतर प्रांतीयच नव्हेत तर दूरदूरच्या परमुलुखांतीलही राजे महाराजे त्या उगवत्या सूर्याला आपले हात रेशमी रुमालानें बांधून लवून लवून मुजरा करतील.

देवा नारायणा ! तो दिवस उगवणार तर खासच पण लवकर उगवूं दे. म्हणजे लवकरच प्रस्तुत राष्ट्रीय कवीच्या भविष्यवाणीचा, अज्ञात व अजात असे मित्र जयजयकार करतील, त्याच्या सुरांत आपला सूर मिळवतील. एक हळुवार कविहृदय आमच्यासाठीं याप्रमाणें रात्रंदिवस धडधडत होतें, असा त्या अजात व अज्ञात मित्रांना प्रत्यय येईल. ही महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची भावना, ही प्रबल आशा, अज्ञातवासीच्या मनांत इतकी जाज्वल्य आहे कीं त्यांचें सारें हृदय ती व्यापून टाकिते, आणि ती निःसंशय सफल होणार यांत तिळप्राय संदेह त्यांस वाटत नाहीं.

**साधुन घे हकनाक वैर हा भंवतीं गोतावळा**
**अंतरिं त्याच्या सूर्य म्हणतसे 'आलों उदयाचला'**
**जीवाच्या होतात चिंधड्या, प्रतिपळ जातो फुका**
**वाजवून घ्या नाणें—हा तर शिवरायाचा रुका.**
**चिरंजीव हा, चिरंजीव हा, शूर मराठा गडी**
**समर्थ हा घेईल एकटा आघाडीची उडी**
**नको आडवूं मार्ग तयाचा माझ्या भुरट्या जगा**
**काय सांग घेशील घे तरी दाम बसाया उगा**

धन्य धन्य होणार हिंदवी कूस याचियामुळें
वेलीवरच्या कळ्या आजच्या तींच उद्यांचीं फुलें

असे ते उद्गारतात. अन्यत्र ते म्हणतात—

हा निजलेला दक्षिण
जातिवंत केसरी पण
नव्या युगाला स्वातंत्र्याचें वांधिल हा तोरण

हा दृढविश्वास या राष्ट्रीय कवीच्या लिखाणाला अपूर्व रंग चढवितो. आजच्या मराठयांची गलित, दुर्बल, तेजोहिन स्थिति पाहून लोकांना असें वाटण्याचा संभव आहे कीं कवीच्या ह्या लांब लांब कोरडया बाता आहेत. जिकडे तिकडे जो तो आपआपलें हित साधण्यांत गुंतलेला असून भराभर पुढें पाऊल टाकीत आहे. ह्या घौडदौडींत वीतभर लंगोटी नेसून ‘ झा झा बाळ्या—’ करणारा हल्या नांगऱ्या मराठा काय दिवे लावणार ? त्याला पुसतो कोण ? नीट डोळे उघडून पहा, अन्य देश किती भराभर पावलें टाकीत आहेत, आणि हा खुळ-चट खुजट मराठा आपल्या शेतांत उभा राहून कष्टसाध्य जमिनीस कशाबशा हंला-नांगरांनीं फोडीत असतां घामानें निथळत आहे. कालाच्या प्रचंड वाव-टळींत हा कोठल्या कोठें कापसासारखा उडून जाईल. पण वस्तुस्थिती अशी नव्हती व नाहींही. आजदेखील मराठयांची आमच्या प्रबल सरकारालासुद्धां दहशत वाटते ती कां ? प्रस्तुत कवीला वाटतें तसेंच त्यांनाहि वाटत असलें पाहिजे ही गोष्ट उघड आहे. आज मराठा गतप्रभ झाला असेल, नसेलही. पण त्याचा उज्ज्वल भूतकाल त्याच्या पाठीशीं आहे, नव्हे, त्याचा भूतकालच वर्तमानकालीं परिणत झाला आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. तवार जाऊन त्याच्या हातीं नांगर किंवा कलम आली असेल, पण त्याचें हृदय मात्र तेंच आहे. त्याची धडाडी, त्याचा करारीपणा, त्याची बुद्धिमत्ता हींदेखील भ्रष्ट झालीं असें म्हणतां येणार नाहीं. नेपोलियनच्या मातींतून पुन्हां शंभर नेपोलियन उत्पन्न होतील, तेव्हां ती फ्रान्समध्यें जाऊं देतां कामा नये असें इंग्लंडला वाटतें तें कां ? गारगोटी ही धोंडा व अन्य दगडही धोंडाच ! दोघांनाही स्पर्श करितां येतो, दोघांनाहि कोणीही लाथाडूं शकतो, पण प्रसंग आल्यास रगड बसली तर

गारगोटींतून ठिणग्या निघतील. ती आग लावून सोडील. ही गोष्ट तज्ञ जाणतो. मराठ्यांविषयीं अशीच जाणीव आजदेखील पसरलेली कोणासही दिसून येईल. तेव्हां प्रस्तुत कवीला वाटत असलेली प्रबल आशा केवळ फोल होय असें म्हणतां येणार नाहीं.

प्रस्तुत कवीच्या रसपरिपोषाचा विचार करितांनादेखील ही मराठ्यांविषयींची भावना त्यांचीं सारीं चित्रें रंगवीत असते असें दिसून येतें. त्यांनीं आपल्या कुंचल्यानें शृंगाररसाचीं चित्रें काढलीं आहेत. त्यांतील रंग भडक नसतील; पण ह्या भावनेनें त्यांत विलक्षण जादू भरून गेली आहे. मराठ्यांच्या चालीरीति, मराठ्यांची मनोभूमिका, मराठ्यांचा धाडशी स्वभाव, मराठ्यांची धडाडी, त्यांचें त्यागपूर्ण प्रेम ( Chivalry ) यांनीं त्यांच्या ह्या शृंगारिक कवितांना अद्भुतरम्य ( Romantic ) स्वरूप आलें आहे. ' मराठेशाहींतील एक प्रसंग ' ही कविता वाचून पहा, किंवा 'कमला' हें गीत वाचून पहा, किंवा ' गोदातटीं ' वाचून पहा. ह्या आणि इतर प्रेमगीतांना ह्या एकाच भावनेनें भारून टाकून स्वर्गांतील पऱ्यांसारिखें फुलविलें आहे. हीं गीतें वाचीत असतां तर्वारीवरील पाण्याप्रमाणें ही भावना लखलखत असलेली दिसते आणि आपण ह्या कलाहीन, निःसत्व, निर्वीर भूमीवर कसेंबसें रेंगाळत नसून कोणा एकाद्या शूर मर्दाच्या देशांत विजेसारख्या चपल घोड्यावर बसून भराऱ्या मारीत आहों असा भास होतो. आपल्या हीन दीन स्थितीचें क्षणभर विस्मरण झाल्यासारखें होतें. आणि एखाद्या वीरश्रीनें नटलेल्या गौरीच्या प्रेमपाशांत आपण जखडून गेलों आहों कीं काय असें वाटूं लागतें. ह्या गीतांतील प्रेम अलौकिक, उदात्त आणि गंभीर आहे आणि ज्याप्रमाणें प्रभातकाल आकाशाला रक्तिमा आणून अपूर्व शोभा देतो त्याप्रमाणें ह्या गीतांच्या कडव्याकडव्यांत रसरसलेली अद्भुतरम्यता ( Romance ) त्यांस अपूर्व शोभा आणून देते. ती मराठ्यांच्या जिव्हाळ्याची आहे आणि पाश्चात्य शिक्षणानें चवचाल झालेल्या कृत्रिम मराठी मनाला तींत दोष दिसले तरी ज्यांस ह्या विकारांचा संसर्ग झालेला नाहीं, अशा अस्सल पौरमराठ्यांना तीं वेधून सोडतील ह्यांत संदेह नाहीं. आणि खरें वाङ्मय तेंच होय कीं, जें समाजांतील अगदीं खालच्या तळापर्यंत भेद करून जाईल. हीं गीतें पंडितमन्य, प्रतिष्ठित नागर

लोकांच्या दिवाणखान्याचीं अलंकरणें तर होतीलच पण एकदां त्यांच्या तुतारीचा रणवैभवध्वनि पौरजनांपर्यंत पोंचला कीं तेथें तो दणाणल्यावांचून राहणार नाहीं, आणि पौरजन हें लोण पिढी दरपिढी पुढें पोंचविल्याशिवाय खचित राहणार नाहींत असें मला वाटतें.

अन्य रसांच्या आणि भावांच्या छटाही प्रस्तुत कवीच्या काव्यांत चांगल्या दिसून येतात. त्यांच्या मुलांबाळांविषयींच्या वात्सल्याच्या छटा तर खरोखरच फार मोहक आहेत.

**संसार**
**नव्हे अंगार**
**धगधगे भवनीं**

अशा वणव्यांत, गडे सुधे !

**तूं फूल**
**पाडिशी भूल**
**आमुच्या भंवतीं**
**फुलबाग उभविशी तेथें अमुची वसती**

हें वाचून कोणाचें मन वात्सल्यानें भरून जाणार नाहीं? 'बाळा अशोका' ह्यांतील करुण रस कोणा कठोराचे डोळे भिजविल्यावांचून राहील ?

**ही सकाळ उगवे फुलांमुलांच्यामुळें**
**रखरखे ऊन हें केवळ आम्हांमुळें.**

असा मुलांविषयींचा उमाळा त्यांच्या बालगीतांत स्पष्टपणें दिसतो. 'कुमारी कुंदा रानडे' पहा कीं 'कुमारी विजया' पहा किंवा 'कुमारी बापट' पहा, ह्या वात्सल्याचा जिवंत झरा ह्यांतून झुळझुळत असलेला कोणालाही मोह घालील. ह्या बालगीतांविषयीं एक गोष्ट ध्यानीं येते ती ही कीं त्यांत तत्त्वज्ञानाचा डांगोरा पिटलेला नाहीं. नीतीचें प्रदर्शन मांडलेलें नाहीं. तर खऱ्या पित्याला किंवा भावाला किंवा स्नेह्याला आपल्या मुलांबाळांकडे पाहून जो वात्सल्याचा जिव्हाळा साहजिकपणें वाटेल तोच त्यांत थबथबलेला दिसतो. आणि खरें काव्य असेंच असतें. तें तत्त्वज्ञानाचीं कोडीं उलगडीत बसत नाहीं,

भावनेनें उचंबळतें, विश्लेषण तोडफोड करीत नसतें, संश्लेषणबलानें वस्तु-मात्राशीं समरस होत असतें.

मुलांबाळांप्रमाणें, आईबाप आणि परमात्मा ह्यांविषयीं भक्तिभावही त्यांच्या गीतांत खळखळत असलेला ऐकूं येतो. ‘ तिचे बाबा ’ ह्यांतील शेवटलीं कडवीं कोणालाही चटका लावतील.

**एवढीच प्रार्थना**
**एवढीच याचना**
**शेवटीं दयाघना**
**पूस आसवांस पितृहीन ‘बाळ’ तळमळे.**

हा स्वपित्याविषयीं आक्रोश कोणाचें हृदय पिळवटणार नाहीं ? या दृष्टीनें त्यांची ‘ आई ’ कवितादेखील वाचनीय आहे. प्रस्तुत लेखकाचे असेच कांहीं वार्धक्यानें वैतागलेले उद्गार वाचून त्यांना जो कळवळा आला तो देखील उल्लेखनीय आहे. त्यांतदेखील प्रस्तुत लेखकाविषयीं जें वात्सल्य प्रगट झालें आहे तें वैयक्तिक असलें तरी काव्य ह्या दृष्टीनें कोणाचेंहि मन वेधल्यावांचून राहणार नाहीं.

प्रस्तुत कवीची देशभक्तीही जाज्वल्य आहे. महात्माजींवरील त्यांचीं गाणीं वाखाणण्यासारखीं आहेत. सर्व वनाला ज्याचा दरारा असा वनराज पिंजऱ्यांत अडकून पडल्यावर त्याची काय स्थिति होते हें चित्र खरोखरी अत्यंत रमणीय आहे. अस्वलाच्या नाकांत वेसण घालून टीचभर पोटाकरितां एकादा भिकारडा त्याला नाचवतो हें पाहून प्रस्तुत कवीच्या ज्या भावना उसळल्या त्या कुणा-च्याही हृदयाचा भेद करून जातील.

**तन मन धन तुज जननी होय मुक्त अर्पुनी**
**देह पडो तव भजनीं आस पूर्ण ही करीं**

हे मायभूमीविषयीं उद्गार काढलेले वाचून

“ But the next dearest blessing that heaven can give
Is the pride of thus dying for thee ! ”

ह्या Thomas Moore च्या उक्तीची आठवण होते.

अलीकडील काव्यांत सृष्टिवर्णनाचा प्रायः अभाव दिसतो. आम्हां मराठ्यांच्या मनाची ठेवणच अशी कांहीं आहे कीं केवळ सृष्टिसौंदर्यानें आम्हांस मोह घालावा इतके कोंवळे आम्हीं नाहीं. आमची जात, आमच्या कड्याटेकड्यांप्रमाणें, दऱ्याखोऱ्यांप्रमाणें, कणखर आणि ताठर आहे. आमचे धागे, आमचे लागेबांधे, आमच्या सख्यासोयऱ्यांत, मुलीबहीणींत, त्यांच्या सुखदुःखांत जितके गुंतून जातात तितके धोंड्याद्गडांत, पाण्यांत पालवींत सहसा गुंतत नाहींत. हा आमचा स्वभावच आहे. आमचीं मनें इतकीं तरल नाहींत हा आमचा गुणही आहे व दोषही आहे. ह्या आमच्या स्वभावामुळें आम्हांला हिंदुपदपादशाहीची भव्य इमारत उभारतां आली. पण ताजमहाल उभारतां आले नाहींत. आम्हांला भक्तिरसाचीं, वत्सलरसाचीं, शृंगाररसाचीं सुंदर कलाकुसरीचीं कामें करतां आलीं. पण आम्हीं काढलेलीं हिमालय, सह्याद्री इत्यादि पर्वतांचीं किंवा गंगा, यमुना, गोदा, नर्मदा इत्यादि नद्यांचीं चित्रें प्रायः ओबडधोबडच आहेत. पण प्रस्तुत कवीच्या लिखाणांत सृष्टिसौंदर्याचें बरेंच प्रतिबिंब उमटलेलें दिसतें. तथापि सृष्टिसौंदर्यासाठीं सृष्टिसौंदर्य ह्या दृष्टीनें त्यांचीं गीतें लिहिलेलीं नाहींत. महाराष्ट्रांतील नद्या-डोंगरांत, ओढ्या-खळ्यांत महाराष्ट्राचा भूतकाल आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणें स्पष्ट वठलेला दिसतो. हीं सह्याद्रीचीं शिखरें, शिवाजी बाजीच्या कथा पुकार करकरून सांगतात त्यामुळें प्रस्तुत कवीला तीं ओढतात. ही भावना त्यांच्या सृष्टिवर्णनाच्या बुडाशीं आहे. अर्थात् महाराष्ट्राचे डोंगर, तेथील गोदावरी, भीमा, कृष्णा तुंगभद्रा, मुळामुठा इ० नद्या ह्यांची छाप त्याच्या लिखाणावर बसलेली आहे. त्यांचें भीषण स्वरूप पाहून त्याला खरखरलेलें रणमैदान आठवतें. त्यांचे कोमल, मृदुल निर्झर ध्वनि ऐकून महाराष्ट्रांतील वीरांगनांच्या कणखर प्रेमाच्या हितगुजाची त्याला ओळख पटते. डोंगरावरील गड त्याला राजाच्या शिरावरील मुकुटासारखा दिसूं लागतो.

**सह्याद्रीवर मुकुट शोभला भाग्यवंत 'तुंग'**

किती समर्पक उपमा ही ! पण त्यांतदेखील मराठ्यांच्या वैभवाची झोकझोक स्पष्ट दिसते.

सार्वभौम सम्राट गडांचा अवघड गड डोंगरी
दक्खनच्या तक्तास कोंडणा धरी उभारुन शिरीं
शिरीं धरा तक्तास खालती लाल रंगला सडा
पहाटच्या प्रहरास तयाचा आठव दे चौघडा
चहूंकडे घनगर्द खालती माजे आंबेवन
उंच जांभळी करवंदींचें करिती संरक्षण
करून आ विक्राळ आपुली दाढ दणाणे दरी
भयाण अन् भेसूर श्वापदें क्रूर तियेच्या उरीं
चपापून त्या घळींत कोठें दडून वाघिण बसे
वाघ भयंकर तिचा लाडका पाणथळीवर दिसे
जंगल हें सृष्टिचें कोंवळें स्वरूप कुठलें इथें
भयाणता माजली भयंकर डाकिण खेकाळते
प्रदेश हा मऱ्हाटी; ठेवण बाहिर कणखर जरी
अंतरंग आंतील कोंवळें घुमे मधुर बांसरी

हें वर्णन अगदीं थेट महाराष्ट्रांतील डोंगराचें. पण याच्याच पुढील मजकूर वाचून पाहिला म्हणजे महाराष्ट्राविषयीं, महाराष्ट्राच्या मर्द शिपाईगड्यांविषयीं मनांतील दुर्दम्य भावनेनें तें चित्र कसें उभें केलें आहे हें स्पष्ट दिसून येईल. तें सृष्टिवर्णनासाठीं सृष्टिवर्णन नव्हे, तर तेथील वैभव महाराष्ट्राच्या गतवैभवाची पुकार करितें, त्याची आठवण करून देतें म्हणून आलें आहे ही गोष्ट उघड आहे. हेतु कांहींही असो; तें अत्यंत रमणीय आहे ही गोष्ट अगदीं खरी. अन्यत्र देखील सृष्टिवर्णनाचा हाच प्रकार दिसून येतो.

उंच कड्यावर निळी हवेली झुले निळ्या गगनीं
लोहगडावर आज नव्यानें चढुनी ये राणी
सौधावरच्या गवाक्षांतुनी बघत असे खालीं
मावळतीचा म्लान रंग उमटला तिच्या गालीं
दूर खालती हिरवीं पिवळीं भाताचीं शेतें
ये रावाची राणी म्हणुनी पातें सळसळतें.

ह्या वरील ओळींतून देखील सृष्टिसौंदर्याच्या बुडाशीं महाराष्ट्रविषयींची भावना खेळत आहे असें दिसतें. हेंच तत्त्व, त्यांचीं सृष्टिवर्णनें सुंदर असलीं तरी त्यांच्या सौंदर्याला कारणीभूत आहे. ह्या सर्व सृष्टिसौंदर्याच्या भोंवतालीं महाराष्ट्रविषयींच्या अनुरागाचें रक्तिम खळें पडलेलें दिसतें. महाराष्ट्राच्या वातावरणानें त्यांवर अद्भुतरम्यतेचें (Romance) इंद्रधनुष्य नाचतांना दिसतें. कांहींही झालें तरी हीं सृष्टिवर्णनें मनोहर झालीं आहेत इतकेंच नव्हे तर सदर भावनेमुळें हृदयभेदक झालीं आहेत.

वरील साऱ्या लिखाणावरून कोणाला असें वाटण्याचा संभव आहे कीं कवि जगाचा नव्हे महाराष्ट्राचा आहे. पण असें वाटणें चुकीचें आहे. Tennyson ला जसें insular म्हणजे वैयक्तिक म्हणतां येईल तसें प्रस्तुत कवीला म्हणतां येणार नाहीं. Tennyson इंग्लंडाच्या वैभवानें दिपून जातो व स्वदेशाभिमानानें अंध होऊन इतर देशांच्या उखाळ्यापाखाळ्या काढतो, फ्रान्स, रशियादिकांचा द्वेष करितो तसें प्रस्तुत कवि करीत नाहीं. सह्याद्रीचें वर्णन करतांना त्याला हिमालयाची आठवण होते. पराधीनतेचें नातें तो सातासमुद्रांपलीकडील मॅक्स्वीनीशीं जोडतो आणि त्याच्या सुखदुःखाशीं समरस होतो.

**पाहोनि हें चित्र भारावलों मी**
**मुक्यानें तुला अर्पितों अंजली**

असें औदार्यानें म्हणतो. वर्डस्वर्थच्या (Wordsworth) इंग्लंडवरील प्रेमाप्रमाणें महाराष्ट्रावरील त्याचें प्रेम व्यापक स्वरूपाचें आहे. कवि आपल्या पत्नीचें कौतुक करितो तें कौतुक वैयक्तिक नसून विश्वव्यापीच असतें. त्याची व्यष्टीच तेथें समष्टी होत असते. कोणाही पतीनें तें पत्निप्रेम वाचून स्वतःच्या पत्निप्रेमाची खूण पटवून घ्यावी. येथें एक गोष्ट ध्यानीं ठेवण्यासारखी आहे. व्यष्टि आणि समष्टीचें नातें गज आणि ठाण यांच्या नात्याप्रमाणें नव्हे. यष्टि आणि समष्टि यांचें नातें व्यवहारातीत व गज आणि ठाण ह्यांतील नातें व्यवहार-

क्षम व निर्जीव. असा दोहोंमधील विरोध आहे. कवीची व्यक्ति म्हणजे अहंकार ( egotism ) नव्हे ही गोष्ट सहसा ध्यानीं येत नाहीं. जेथें कवीची व्यक्ति सर्व विश्वाला व्यापून टाकते तेथेंच ती मर्यादाविशिष्ट असते हें कोडें वाटतें. पण हा विरोध नसून विरोधाभास आहे. मला वाटतें कीं कवीची व्यक्ति जितकी जितकी अधिक मर्यादाविशिष्ट तितकी तितकी ती अधिक विश्वव्यापी असते. शेक्सपीयरच्या ( Shakespeare ) सर्व नाटकांत जिकडे तिकडे शेक्सपीयरची व्यक्ति व्यापून राहिली आहे ही गोष्ट निर्विवाद होय. पण म्हणूनच शेक्सपीयरनें केलेल्या अलौकिक, कल्पनामय जगांत ह्या जड, प्रत्यक्ष सृष्टीवरील शेक्सपीयरची छायादेखील दिसून येत नाहीं. त्याचा यागो ( Iago ), त्याची डेस्डिमोना ( Desdemona ), त्याचा हॅमलेट ( Hamlet ), त्याची ऑफीलिया ( Ophelia ), त्याचा रोमियो ( Romeo ), त्याची ज्युलियेट ( Juliet ), फार तर काय ह्या जड सृष्टीवर कधीं न संभवणारा त्याचा एरियल ( Ariel ), त्याचा कॅलिबन ( Caliban ), त्याचा पक ( Puck ), त्याचा ऑबेरान ( Oberon ) तोच स्वतः असूनही त्याची व्यक्ति त्याच्या निर्मितींत इतकी जिरून गेलेली आहे कीं कोठेंही शेक्सपीयरचा गंध येत नाहीं. पण त्या सर्व स्त्रीपुरुषांचा, नद्याडोंगरांचा, वनाउपवनांचा, अप्सरा पऱ्यांचा निर्माता शेक्सपीयरच होता; त्याचेंच रक्त, त्याचेंच मांस, त्याचींच हाडें, त्याच्याच भावना, त्याचेच तरंग, त्याचेच विचार ह्या सर्व प्रतिसृष्टींत लीला करीत आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. त्याच्या निर्मितींतून त्याची स्वतःची व्यक्ति वगळा मग काय उरेल ? पहाटच्या धुक्याप्रमाणें त्याची सृष्टि विरघळून जाईल. ह्याचें कारण हें कीं जगांतली प्रत्येक वस्तु जरी आपल्या भिन्न भिन्न स्वरूपाची दिसत असली तरी त्यांचें जीवन सर्वत्र एकच होय. आणि जेव्हां कवि ह्या जीवनाच्या नेत्रानें सर्व विश्वाकडे पाहत असतो तेव्हां त्याची व्यष्टि आणि समष्टि एक होऊन जाते. एरवीं त्याचे विचार वाचून हे माझेच विचार आहेत असें वाचकाला कसें वाटेल ? शेक्सपीयरचें उदाहरण मी हा तात्त्विक मुद्दा स्पष्ट करावा म्हणून घेतलें आहे त्याचा कोणी भलताच विपर्यास केला तर अनर्थ ओढवेल. तात्पर्य काय कीं अज्ञातवासींची महाराष्ट्रा-

विषयींची भावना अहंकारमूल आहे आणि म्हणून वैयक्तिक आहे असें कोणी समजूं नये.

आतां एकच मुद्दा आणखी लिहावयाचा राहिला तो कवीच्या भाषाशैली-संबंधीं. एकंदरींत भाषा डौलदार, सुबोध आणि शुद्ध आहे. पण येथेंही मराठ्यां-संबंधीं त्याची भावना प्रतिबिंबित झाल्यावांचून रहात नाहीं. जशी भावना तशी भाषा हा साधारण नियमच आहे. भावना जितकी मृदु मधुर प्रौढ कठोर तितकी भाषादेखील मृदु मधुर प्रौढ कठोर. याचें कारण असें कीं कविता ही सहजोद्गार होय. हा सामान्य नियम खऱ्या कवितेला लागूं पडतो. प्रस्तुत कवीची भाषाही अशीच आहे. मराठ्यांविषयींचा अभिमान त्यांना बोलावयास लावितो. यामुळें मराठ्यांच्या वैभवकालीं जी शाहिरी-शैलीची कविता निर्माण होत होती त्या वळणावरच नकळत त्यांची भाषा जाते. पण, हा त्यांच्या कवितेचा स्वभाव आहे. कृत्रिमपणा नव्हे. अलीकडे कै. गोविंदाग्रजांनीं शाहिरी कवनांचा चांगला अभ्यास करून भाषेचा एक नवीन पंथ निर्माण केला. तो अभ्यासाचा परिणाम होता म्हणून त्यांत कृत्रिमता आली होती. शाहिरांनाही न सुचलेले फारशी शब्द त्यांच्या लिखाणांत विखुरलेले दिसतात. खरोखरीच स्वाभाविकपणें कोणी अशी भाषा बोलत असेल काय हा प्रश्नच आहे. आणि तशी भाषा आपण मराटे जर बोलत नसलों तर ती कृत्रिम होती असें म्हणणेंच प्राप्त आहे. पण या नवीन टुमेनें लोकांचे डोळे दिपले आणि जो तो तिचेच उदासवाणे पडसाद आपल्या लिखाणांतून उठवूं लागला. पण अशा तऱ्हेची कृत्रिमता प्रस्तुत कवींच्या लिखाणांत दिसून येत नाहीं. ती अभ्यासाचा परिणाम नव्हे तर मराठ्यांविषयींचा तीव्र अभिमान त्यांना शाहिरी वळणावर ओढून नेतो. म्हणून ती स्वाभाविक होय. कृत्रिम नव्हे. याचीं हवीं तितकीं उदाहरणें देतां येतील. पण आधींच लेख मोठा झाल्यामुळें तीं देत नाहीं. तथापि या विधानाचें एक प्रमाण म्हणून मला एक गोष्ट सांगावीशी वाटते ती ही कीं, जेथें ते आपल्या स्वतःच्या वातावरणांतून निघून अन्य वातावरणांत प्रवेश करितात तेथें क्वचित् स्थळीं त्यांच्या भावनेचा ठसा त्यांच्याच हृदयावर नीट उमटला नसल्यामुळें त्यांची 'भाषाही त्या मनःस्थितीला अनुरूप अशी

अंधूक होते. हा त्यांच्या लिखाणांतला दोषच आहे असें म्हटलें पाहिजे. आधीं तर तो फार क्वचित आढळतो आणि दुसरी गोष्ट अशी कीं ते नैसर्गिक कवि आहेत याचें तें प्रमाण होय. कवि आपल्या भावनेच्या भरांत आला म्हणजे तो कधीं कधीं टापटिपीकडे दुर्लक्ष करीत असतो. त्याची भावना उसळ्या घेत असते तेव्हां टापटिपीकडे कोण लक्ष देतो अशीही स्थिति कोठें कोठें झालेली दिसते. उदा०—'संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो' या नियमाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलेलें आहे. पण खरा रसिक या गोष्टीची पर्वाही करणार नाहीं. गोविंदराव देवलानीं ' हंससुवंशमशाला '—असा गंगाजमनी प्रयोग केला आहे. एखादा अरसिक चिकित्सक याबद्दल त्यांना दोष देईल. पण रसिकाचें लक्षही तिकडे जाणार नाहीं. भाषा जर भावनेचें खरेखुरें प्रतीक असेल तर ती प्रवाहशील झाल्याशिवाय राहणार नाहीं. आणि प्रवाहाचा वेग असा असतो कीं तो मोठमोठाल्या दगडाधोंड्यांनादेखील गोल करून सोडतो. त्यांचे कानेकोंचे मोडून गुळगुळीत करून टाकितो. मोठमोठाल्या प्रचंड वृक्षांना भरकन् वाहून नेतो. या दगडाधोंड्यांची, काष्ठादिकांची, त्याला अडचणदेखील होत नाहीं. अशीच गोष्ट भावनामूल काव्याची होय. ही गोष्ट ध्यानीं आणली म्हणजे प्रस्तुत कवीच्या दोषांकडे कोणी लक्ष देणार नाहीं असें मला वाटतें.

शेवटीं सांगावयाचें तें हें कीं, प्रस्तुत कवीचीं कवनें उज्ज्वल स्वाभिमान आणि स्वदेशाभिमानाचीं पोषक, राष्ट्रीय भावनांनीं रसरसलेलीं रसपूर्ण, आणि भाषाशैलीच्या दृष्टीनें प्रवाहित, प्रसन्न व स्वतंत्र अशीं आहेत. हें वरील साऱ्या विवेचनावरून ध्यानीं येईल. म्हणून तीं मी रसिकांपुढें आदरपूर्वक मांडीत आहें. तेव्हां—

**अंजली धरुन अर्पिली**
**भक्तिनें दिली**
**म्हणुन तरि घेणें.**

एवढी गोष्ट मनांत वागवावी म्हणजे माझें काम झालें.

लश्कर, ग्वाल्हेर.<br>२४-११-१९३३ }

भा. रा. तांबे

# अज्ञातवासींची कविता

# रसिकाप्रत

मी तुम्हांसारिखा तुम्हांमधें खपणारा
एकलेपणा मज होय भयंकर कारा.
चहुंकडे दिसति मज फुललेलीं मुखकमलें
ही बाग फुलांची माझ्यासंगें डोले
स्फूर्तिचा झरा हा इथें खळखळे कळलें
प्रिय तुम्हाकडिलही वारा.

जें तुम्हां आवडे तेंच मला आवडलें !
जें मला रुचावें तेंच तुम्हांला रुचलें !
मजसमोर सगळे रसिकच कैसे ठेले
हा चमत्कारची सारा !

ह्या नव्या युगाचे पाइक तुम्ही थोर
या चला झटूं बांधण्या नवें मंदीर
स्वातंत्र्यदेवता उभी सचिंत समोर
मी वाजविणार नगारा.

या जगास आहे वेड हिऱ्यामोत्यांचें
पण तुम्हापुढें तें फिकेंच तेज तयांचें
वाटेल तुम्हांला नवलच रसिका ! याचें
जा पुसा कुणा परभारा.

जीं आजवरी मी गुंगत आलों गाणीं
तीं स्वयें ठेविलीं तुम्हांपुढें गुंफोनी
स्वीकरा म्हणति हीं फुलें तुम्हांलागोनी
मी मात्र खुळा खुडणारा.

# सोन्याची द्वारका

हे तरुणा ! ऊठ, असा खिन्न होशि कां ?
सोन्याची उभवूं ये फिरुनि द्वारका.

पोलादी मनगट हें तुजसि लाभलें
बुद्धीचें वैभवही त्यांत चांगलें
नीतीचा थोर म्हणुन तुज प्रशंसिलें
लाखाची घटिका नच जाउं दे फुका.

बघ मागें वळुन जरा काय चाललें
मिटुन असा घेउं नको नेत्र आपुले
तूं स्फुरतां आशेची बाग ही फुले
पेट न कां घेत अजुन हृदय-होलिका ?

विश्वाखुन प्रभु तुजवर जन्म दे भला
दाखवीं प्रभाव तूंहि आज त्याजला
ऐक ! मायभूहि हांक मारिते तुला
वीरांची बघत तुटूं रत्न-मालिका.

फाड जीर्ण जें जुनाट मलिन जाहलें
ओत सूर जे स्वतंत्र सौख्य ज्यांमुळें
स्वर्ग नवा उभवाया शक्त जाहले
तुजवांचुन सोन्याची होय मृत्तिका.

# भविष्यास

भटकत वेड्यापरी
भविष्या ! दृष्टि खिळुन तुजवरी.

घरदाराची केली माती
गवत उगवतें जोत्यावरती
धुळीस मेळविली ही शेती
बोंचत कांहीं तरी.

अन्नावांचुन तडफडतो जरि
कांहिं न वाटे त्याचेंही परि
लज्जेस्तव हें वस्त्र शरीरीं
करपे वरचेवरी.

तुटोत सारे धागेदोरे
मरोत तिकडे सखे सोयरे
हृदयपटल हें केलें कोरें
नवेंच लेखन वरी.

लिहित असें मी एकच लिहिणें
हृदयावर तें तेंच कोरणें
तेंच वाचणें तेंच पढविणें
ध्यास हाच अंतरीं.

भूतकाल छातीवर बैसे
म्हणुन कधीं देतोहि उसासे
वर्तमान आशेनें हांसे
जगे तेवढ्यावरी.

दूर तुझें नच मंदिर आतां
जाणिव ही दे धैर्यच चित्ता
तुझ्याकडे ज्या जाती वाटा
साफसूफ त्या करीं.

# मधोमध नावच पडली फशीं

मधोमध नावच पडली फशीं
नाविका ! तुजसि दया नच कशी !

जवळ न आतां तीर राहिला
वेग न नावेलाही पहिला
वाराही प्रतिकूल जाहला
कशी ही वेळ लागली अशी !

बाळ उराशीं घट्ट बिलगला
न कळे कांहीं त्या राजाला
आईचा पण कंठ दाटला
हळूहळु अपुले डोळे पुशी.

भावावुनही नाविक गेला
रात्र पसरली न दिसे त्याला
तोडी वल्ह्यांनीं पाण्याला
तयाची झाली कासाविशी.

उरांत माझ्या ह्याच भावना
घालिति रात्रंदिन धिंगाणा
देवहि वरुनी बघतो दैना
जगीं ह्या खुशाल लोटुन मशीं !

## जगच जगे हृदयांना चुरडुन

हृदया ! स्थान न तुज मजपाशीं
शोध धुंड अन्यत्र फुलांच्या राशी.

जीव जीवनीं न मुळीं रंगे
सर्वस्वाची आशा भंगे
न गुंतले कोठेंही धागे
सख्य कशास तुझ्याशीं.

जपलों खपलों तुझ्या रंजनी
तूंच एक आधार कल्पुनी
अनन्यभावें तुजसि सेवुनी
कारण, या विरहासी.

जा मज सोडुन तूं कोठेंही
नको विचारूं मज कांहींही
जग हें विमनस्काचें नाहीं
इथला तो न मिराशी.

मजसि जगूं दे हृदयावांचुन
मजसि मरूं दे हृदयावांचुन
जगच जगे हृदयांना चुरडुन
विलगाशि सांग कशासी ?

## सावकारा !

घे ओढुन पूर्णपणें रक्त सावकारा !
अस्थींचें वेष्टण पण राहुं दे उदारा !

बाजूला सार जरा पैशाची थैली
घे टिपुनी जखम असे जोंवर ही ओली
वेळ कशी सोन्याची चालुनीच आली
काय म्हणुन व्हावें तूं तरी पाठमोरा.

गोड किती धार तुझ्या तीक्ष्ण हत्याराची !
आणि चटक मज लागे तुझ्या कुशलतेची
अंध असुनही श्रद्धा सतत टिकायाची
जीवाचा जिवलग तूं ! कळे हें उशीरां.

रक्तावांचून मीहि दाखविन जगांनी
जें न कुणी केलें तें दाखविन करोनी
ठेवियली उदबत्ती, पहा ! पेटवोनी
बाकीचा घे आटप येथला पसारा.

# हे धना !

हे धना ! तुझा जगीं जयजयकार
दास तुझें जग, करि सत्कार.

तुझा कोथळा वरुन गोजिरा
आंत खरखरे सदा सहारा
जिथें पडे तेथला निखारा
मौज उडे तत्क्षणीं अपार.

हास्याचे ध्वनि तूं उडवीसी
कारंजीं सहजीं नाचविशी
अवकृपा हो जरि थोडीशी
मातिमोल त्याचा संसार.

धन आधीं मग विश्व उमललें
मत्स्यासाठीं जल अवतरलें
सौगंधास्तव फूलही फुले
अनुभव ये हा वारंवार.

—आणि मानवा ! तुझीहि धडपड
क्षुद्र वृत्तिची केवळ तडफड
एकच भाषा एकच बडबड
धन हा सर्वस्वीच विचार.

स्वार अशा ह्या मी शक्तीवर
धरिलें शस्त्रहि करिं बळवत्तर
हांस धना ! उपहासहि वा कर
राक्षस तूं—तूं खल अंगार.

# कलेप्रत

धुंडितसे जग, कले ! तुला
आश्चर्यच वाटे मजला.

जिकडे तिकडे तुझीच मूर्ती
चोहिंकडे दुमदुमते कीर्ती
अव्यक्ता तूं होशी पूर्ती
हें न कळे तो खरा खुळा.

रंग घेउनी बसे चितारी
अडे धडपडे भारिच स्वारी
कागद कोरा कुंचलि कोरी
तंत्रांतच अडला पडला.

शब्द देत तिकडे कुणि उधळुन
मोजमोजुनी पण मात्रा गण
काव्याचा तो प्राणच समजुन
जलावीण पिकवीत मळा.

हवें खरें सोन्याचें नाणें
घडती कसलेही दागिने
हृदयांतूनच उमटे गाणें
चिकटे गंध न कधीं फुला

# मराठेशाहींतील एक प्रसंग

लाख होन खर्चून बांधिला रायांनीं वाडा
अजुन कुणाचि न प्राज्ञा झाली द्यावयास वेढा
डोंगरमाथ्यावरी उमललें; आंत त्यांत फूल
चालरीत नागरी : पडावी कुणासही भूल.

*  *  *

आवडलें मी त्यांना, माझे आवडले डोळे
आईपाशीं असेंच कांहीं राया कुजबुजले.
कोण कोठचे कळलें नाहीं मज हे उमराव
कोण बरें सरदार मराठी काय नांव गांव ?
अजुन कुणी नाहींच वर्णिलें तेंच बरें झालें
( १ ) हृदयीं प्रिय मम मूर्ति तिच्याशीं असते मग तुळिले.
आठवतें मज अजुनीः चुकवुन रायांचा डोळा
अरुंधतीला साक्ष ठेवुनी वरिलें ना ? मजला
हुरहुर ह्या वेडीस लावुनी गेला ते गेला
तेव्हांपासुन—माहेर न हें—परक्यांचा किल्ला.
इथें यापुढें घरांत माझ्या लग्नाची घाई
उदइक आला नाहीं तर मी कोणाची नाहीं.

*  *  *

स्तब्ध चहुंकडे, भुंके दूरवर कुतरें मरतुकडे
लक्ष न देई दुपारच्या ह्या वेळिं कुणी तिकडे
आणि वाजल्या टापा—दौडत आंत येत घोडा
खड्या पहाऱ्यांतून अचुक ने वेडीला वेडा.

उंच कड्यावर निळी हवेली झुले निळ्या गगनीं
लोहगडावर आज नव्यानें चढुनी ये राणी
सौधावरच्या गवाक्षांतुनी बघत असे खालीं
मावळतीचा म्लान रंग उमटला तिच्या गालीं
दूर खालती हिरवीं पिवळीं भाताचीं शेतें
ये रावाची राणी म्हणुनी पातें सळसळतें
सृष्टिदेवि औदार्य आपुलें चोहिंकडे उधळी
जलबिंदू चमकून शोभल्या जरतारी शाली
अजुन न झाली येवुन येथें उणीपुरी घटका
(२) तोंच हिला कां लागे? बाहिर बघण्याचा चटका
सृष्टिदेवता काय येवढा मोह हिला घाली
म्हणुन अशी ही गवाक्षामधें सारखीच बसली
किंवा दिसती ते फौजेसह क्रुद्ध वृद्ध बाबा
म्हणुन बघे? पण कशास आतां घोर हिला व्हावा?
लाख बाण लागून कोसळुन जो न पडायाचा
कुसुमशरानें केला जखमी ज्याला कायमचा
'तो असतां—ही भीति कशाला बाळगशी? बाई'
असेंच कांहीं बोलत कोणी—जवळ उभा राही.
—आणि कड्यावर निळी हवेली झुले निळया गगनीं
सह्याद्रीवर वारा घुमवी डोंगरचीं गाणीं.

सह्याद्रीवर मुकुट शोभला शोभिवंत 'तुंग'
सृष्टीनें बहरून मोहिला आसमंत भाग
लाख होन खर्चून बांधिला ह्याच इथें वाडा
एकुलत्या लाडक्या मुलीचा रायांना ओढा
सौंदर्याची सीमा म्हणुनी निर्मी विधि काय ?
महाराष्ट्र-लक्ष्मीचा येथें होय नवा उदय !
—आणि रायही थोर : राहणी ऐटबाज मोठी
भाग्यवंत समशेर करुं न दे त्यांस कधीं कष्टी
मनोभंग ठाऊक न ऐसा उमदा उमराव
( ३ ) वृद्धपणीं सोसावा लागे त्यां मर्मी घाव
गडावरुन त्यांच्याच नाहिंशी भरदिवसा व्हावी
आणि त्यांत त्यांचीच पोर अन् परक्यानें न्यावी.
अधिक काय ह्याहून पाहिजे लांछन वीराला
मरण नको मरणाहुन मोठा अपमानच त्याला
हादरलें ऐकून थरारे पीळदार अंग
क्षण वाटे होईल कडाडुन भूगोलहि भंग
लालबुंद इंगळ्या पेटल्या भेसुरले डोळे
बळी ह्यांत पडणार कुणाचा—तें निश्चित झालें
डोंब असा पेटला : भयानें गड थरथर हाले
पाउस भुरभुर पडे त्यांमध्यें सृष्टि डुले डोलें.

पूर्वेच्या क्षितिजावर आतां लाली रंगेल
किरण कोंवळे तरुलतिकांशीं समरस होतील
आणि जगावर उदासीनता मग कुठची कुठची
काळोखाच्या मागें जाइल खरेंच कायमची
थंडगारही वाहत आहे पहाटचा वारा
धरा प्रफुल्लित करुनी जाई ढगाआड तारा.
परंतु ह्याचें काय ? पेटली जिथें उरीं होळी
विधीच जेथें लिही अक्षरें जळजळतीं भालीं.

म्हणुन राय बुरुजावर दिसती उभे बघत वाट
( ४ ) दूत धाडिले चोहिं दिशेला दृष्टि वेध घेत.
आशा हृदयामधें खातसे खूप हेलकावे
क्षणांत वाटे त्यांना तिजला शोधाया जावें

पहा पहा तो कोण दूरवर धुक्यांतुनी येई
येतो कसला—आला आला—त्या सगळी घाई
थबथबला तर हा घामानें. कोण बरें आहे ?
आश्चर्यानें वृद्ध न्याहळुन त्याजकडे पाहे !

‘ हे तर अपुले ते—ते—ज्यांना आवडली बाळी
आणि कोण ही मागें त्यांच्या घोड्यावर बसली ?
काय—राव—हे तुम्हींच—ऐसें काय म्हणुन केलें ?
मी म्हातारा बघुन काय मज ऐसें फसवीलें ! ’

‘ तसें नव्हे—मज राया ! पडलें निराळेंच स्वप्न
म्हणुनच झाली चूक अशी ही माझ्या हातून ’
‘ तरुण मुली हें तुला शोभलें—पण मी म्हातारा—’
भुंके, मिळविण्या सूर ह्यांत तो, मरतुकडा कुतरा.
आणि राय मग आश्चर्यानें मनीं गुंग झाले
फूल लाडकें निळ्या हवेलीमध्यें डुले डौलें.

## कशाला मागें बघशी वळून

कशाला मागें बघशी वळून
लाख टोचण्या उभ्या राहतिल टोंचायातें फिरून.

उतरायाचा आतां डोंगर
चढण संपली दुर्धर खडतर
नहि खचली इतुक्यानें कंबर
दृष्टि न दे पण ढळून.

गोजिरवाण्या लहानपणची
सकाळ सखया ! आतां कुठची
स्वप्निंहि फिरुन न ती यायाची
श्रमशि फुका हळहळून.

तेव्हां होतें सोनें पिकलें
वैभवही सृष्टिचें आगळें
तसा न ओढा अतां खळाळे
वसंत गेला उडून.

आणि आपुले सखे, नको ती
—आठवणींची भलत्या भरती
आज आपुल्या हातीं माती
पुरतें आलें कळून.

ग्रंथ संग्रहालय

खोल खालती आतां उतरण
जप रे जीवा ! प्रत्येक क्षण
संपायाची लवकर वणवण
म्हणुन तरी घे हसून.

पाहियलीं जगिं सगळीं सोंगें
केलें माझें मीही अंगें
शेवटचे पण विणतां धागे
हृदय जात कुस्करून.

## हरिजन

ऊठ ! तुझ्या अंगणांत हरिजन हे पातले.

भाग्य तुझें थोर म्हणुन
घटिका ही येत जमुन
आणि पहा ! ते सुरगण
सिद्ध उधळण्या फुलें.

हृदयाची ठेव चाड
सत्याची ठेव चाड
उघड उघड रे ! कवाड
म्हण त्यांना आपुले.

देवापासून दुरी
धर्मापासून दुरी
ठेवियले आजवरी
आणि काय साधिलें ?

होउं नको रे ! निष्ठुर
झाले जनही अधीर
प्रेमें धर कर सत्वर
हृदय होउं दे खुलें.

पापांचें कर क्षालन
झालें तें गंगार्पण
वेचुं नको आतां क्षण
बंधु तुझे रंजले.

# कुणि कांहि म्हणो

कुणि कांहिं म्हणो मन मानेल तें
पण तूं रसिका ! न कधीं वद तें.

मनांत अगदीं गुणगुणतांना
ध्यानमग्न मी छेडीं वीणा
त्या येती तुज ऐकूं ताना
हें प्रेम तुझें मज लाजवितें.

भवसंगरिं मी नम्र शिपाई
चाकरींत करिं कधिं न ढिलाई
ह्या संग्रामीं लगबग घाई
तनु जर्जर रे सहजीं होते.

वार लागती असंख्य येथें
मन त्यांतुन कवनास निर्मितें
आनंदाचें ये मग भरतें
कधिं हें कधिं तें तुजला पटतें.

विसरो मजला जग व्यवहारी
विसर कधीं नच तूं माझ्या हरि
नादविता ह्या हृदयिं बांसरी
बघ येशिल तूं माझ्याच इथें.

# शब्दांनो !

अहो शब्द ! माझे कुठें चाललां ?
न वाऱ्यावरी जा, न ऐसे विरा
तुम्हां गुंफितों मद्विचारामधें
जरा बद्धता आमुची स्वीकरा.

मला वाटतें मी धरावें तुम्हां
तुम्हां वाटतें स्वैर जावें उडून्
तुम्हां ध्येयदाता नि सौगंध मी
तुम्हीं टाकणें ही धरा दरवळून.

अहो लाडक्यांनो ! तुम्ही गोजिरे
खपुष्पें तुम्हीं अन् हिरे मौल्यवान्
तुम्हांकारणें ही धरित्री फुले
तुम्हाकारणें ही असे भाग्यवान्.

असे शक्ति, सामर्थ्य जें अंतरीं
तयानें तुम्हां भारुनी टाकितों
अतां लाडक्यांनो ! कुठेंही चला
चमत्कार साऱ्या जगा दावितों.

# आग पहा लागली

घराला आग पहा लागली
कडकड कडकड तुळइ कडाडे, पडते जळती फळी.

पळत सुटे जो तो घाबरुनीं
भीति जिवाची उरिं बाळगुनी
दाहि दिशा सारख्याच समजुनि
धरि न आस मागली.

विशाल ज्वाळा दिसति भयंकर
भस्मसात करणारच हें घर
तुफान वाऱ्याचीहि त्यांत भर
काळ वेळ उलटली.

या हो ! या हो ! हिकडे कोणी
सर्वस्वच जातसे जळोनी
पळूं नका ऐसे बावरुनी
मी इकडे एकली.

दूरवर दिसे तटस्थ जनता
साक्षीला ती अग्निदेवता
हृदयिं तियेच्या पूर्ण तृप्तता
शांति तिला लाभली.

खांब जळे अन् भिंत कोसळे
धूर भरे क्षणिं अग्नि उसळे
पोलादीहि तिजोरी वितळे
कुलदेवी कोपली.

शांत शांत होशिल ना देवा !
आजवरीचा अर्पित ठेवा.
तुझ्याच चरणीं हीस विसावा.
ओळख पटली भली.

## म्हणा तर

म्हणा तर रात्र तिला आंधळी
फासली अवसेला काजळी.

जग नव्हतें, नव्हते जल अग्नी
पंचमहाभूतांतिल कोणी
नव्हती रसना नव्हती वाणी
कुठली काळि पाकळी.

कालहि नव्हता, नव्हता काळहि
पण 'अद्भुत' दडलेलें राही
वर्तमान त्यांतूनच येई
फुलवित काळि कोंवळी.

तोंच अचानक ब्रह्म ये पुढें
उधळुन देई अवघड कोडें
—आणि लागले चालूं गाडे
पृथ्वि घुमूं लागली.

अंधारांतुन तेज जन्म घे
चांचपडत मग जीवही निघे
भवितव्यहि हळु मागें लागे
सुखदु:खाची मुळी.

कशास आतां हसणें रडणें
नक्षत्रांचें गणित मांडणें
उचल गड्या! ओझें प्रेमानें
जों न तनू भारली.

# असे जग हें माहेर उपेक्षेचें

घर तयाचें तें जरी चंद्रमौळी
प्रीत त्याची त्यावरी जडुनि गेली
दूर कोंकण येथून फार आहे
जीव त्याचा तेथेंच गुंतलाहे.

कधीं नव्हतें ठाऊक अजुनि त्यास
दूर जाणें त्या सोडुनी घरास
माय त्याची आंधळी घरीं राही
दैव त्याला तेथून दूर नेई.

वय तयाचें अजुनी न मुळीं फार
कष्ट त्याला हे कसे झेपणार ?
बाळ आईस्तव असा रावतांना
देवराणा कां कळेना द्रवेना !

आज त्याला उठवे न मुळिं सकाळीं
ताप भरला सारखा त्यास जाळी
कोण तिकडे पाहतो जग न त्याचें
असे जग हें माहेर उपेक्षेचें !

आणि गेला अस्तास अंशुमाली
बाळ निजला तो त्याच शांत वेळीं
आणि निजला तो कधिं न उठायाचा
तिलांजलि हा त्याजला आंसवांचा !

## पोपट आणि मैना

त्या पिंजऱ्यांत पोपट मैना
जा पढवा शिकवा त्यांना.

धर्म म्हणे हें, धर्म म्हणे तें
अर्थ खोल तत्त्वांचे मोठे
उघडा पोथ्या—तुम्ही जाणते
तुकवतील त्याही माना.

शास्त्री पंडित अहांत आपण
धर्मशास्त्रकोविदहि विचक्षण
हरहर ! नाहीं तुम्हां हृदय पण
जाळा जा तुमच्या ज्ञाना.

मंदिर मोठें रत्नखचित जरि
सोनें चमचम चमके शिखरीं
जरि न आंत तो राहे श्रीहरि
स्मशान तें वैभव माना.

हृदय जिथें तेथें तेथें तो
धर्म नसे पोथ्यांत पडुन तो
हेंच राम कृष्णही शिकवितो
फिरुन तुम्हीं या दयाघना !

# एकवार वाटे कीं—

एकवार वाटे कीं मीच आजला
तोडुन टाकीन ही प्रचंड शृंखला
आजवरी अश्रूंनीं पंख भिजविले
ते न उडाया समर्थ आजला कळे.

म्हणुनी मी खिन्न खिन्न
होइन कैसा प्रसन्न
रुचतें नच मजसि अन्न
चिंतेनें ह्याच एक देह पोळला.

मानेवरती पातें नित्य तळपतें
उंच मान करुनी नच दृष्टि पाहते
दुःखपूर्ण सर्व जिणें
होई केविलवाणें
नशिबीं ऐसें जगणें.
सौख्यहि त्या भोगाया दुःख वाटतें.

प्रेमानें जग सगळें मजसि आदरी.
हेंही मज शल्य एक बोचतें उरीं.
हें ओझें उतरण्यास
शक्ति नसे मजसि खास.
हा म्हणुनी बंदिवास
चुकवाया मी प्रयत्न सारखा करीं.

# मज वेड लागलें

मज वेड लागलें म्हणा तुम्हीं कांहींही
मन अस्थिर माझें शोधित आहे ' कांहीं.'
धुंडिलीं काय मी वनें उपवनें थोडीं
पाऊस मानिला नाहिं उन्हाळा थंडी
हृदयांत वसतसे आस बापुडी वेडी
ती देत निराळी ग्वाही.
मज वाटे केव्हां स्वस्थ बसून रहावें
मज वाटे केव्हां उगीच गात बसावें
मज वाटे केव्हां अहोरात्र चिंतावें
मन त्यांत न रमुनी जाई.
मी कधीं उठोनी शहर धुंडितों फिरतों
वाटेंतच केव्हां उभा मुकाट रहातों.
मज पुतळा समजुन सहजच बघतो जो तो.
ही मौज जगाला होई.
हें सगळें मजला समजत कां हो नाहीं ?
पण हृदयीं भिंगरी गरगर फिरतच राही
ती मजला अगदीं स्वस्थपणा नच देई
जा धुंड म्हणे अजुनीहीं.
सौगंध फुलांचा, द्राक्षाचा रस किंवा,
तो झरा गात त्यांतील चारुता किंवा,
मी काय लुटूं हो ! हृदयच माझें किंवा,
आशेला जागा नाहीं !

## जगताची धांव पुढें

ह्या जगताची धांव पुढें
हें सत्य असे उघडें उघडें.

फडफड फडफड पंख फडाडित
काळ पळे आघाडी गांठित
हे वृद्धा ! हो अजुनि पुरोगत
गिरवुं नको मागले धडे.

चकचक चकचक करिते बिजली
औषधास न मिळेहि साउली
घुपाटण्यांची दाद कोठली
तळघर त्यानें मात्र अडे.

नवी भिंगरी नवीच गिरगिर
नांव नको ठेवूं त्या ' संकर '
जुना वृक्ष घे नवीन अंकुर
ढोंग्या रे ! थांबवी रडें.

पार्थ शूर पण, अडला होता
कृष्ण पढवि मग भगवद्गीता
ऊठ पुढें हो ! उजळिं भारता
सैन्य असे मागेंच खडें.

# देवी आशे !

हे देवी ! अंध म्हणुनि बंद तुझे डोळे !
जगत् तुझ्या पायाशीं मौजेनें खेळे.

बांधिलेस पदिं नूपुर
त्या नादें गुंगत नर
चिरिलें जरि कुणि चरचर
हसविशी दयाळे !

वृद्ध असो तरुण असो
स्त्री किंवा पुरुष असो
कोठेंही कोणि असो
खेचिशी कृपाळे !

दिवस रात्र वघशि न मुळिं
फेकिशि तूं किरणावलि
अबल शबल किंवा बळि
झुलविशी नृपाळे !

पण—, माझा तुजवरि नच
खचित खचित विश्वासच
हे आशे ! करिं क्षमाच
मी फटकळ बोलें.

# एके काळीं

एके काळीं आम्हीं होतों या इथले राजे
त्रिखंडांत आमुचेंच वैभव एकमुखी गाजे
एके काळीं—,पहा उघडुनी मागिल इतिहास
कुठल्याही पानावर फिरवा नजर राजरोस
दिसेल तुम्हा : अमुच्या मुलुखांतून अबादानी
खूप शर्थिनें राज्य राखती लोक खानदानी
चोहिंकडे आमुचाच चाले जय, जयजयकार
चोहिंकडे आम्हास्तव गुंफित रत्नांचे हार.
रणदेवी तर प्रसन्न—केवळ होती कुरबान
मान खुपसुनी दऱ्यांत दडले शत्रू गांगरून
तो शिवनृपती : आमुच्याच रे ! हाडामासाचा
पुन्हा एकदां उघडा पानें इतिहासाचि वाचा
थरथरुनी जाईल अंग अन् भरेलहा स्फुरण
आवरतां आवरतां होइन मीही बेभान
एके काळीं ऐसे आम्हीः ध्या हें समजून
तोंच उठे खडबडुन काळ अन् बोले दापून
—' काय चालली वटवट तुमची, कोण कुणाचा तूं
जाब विचारावया राहतिल खडे पुढें पणतू
मान खालती घालुं नको; ते नको सूर रडवे
पराक्रमी पुरुषानें गाणें छातिठोक गावें.
ऊठ येथुनी, कर जा कांहीं, गाउं नको गाणीं
गाइल पुढची पिढी असें कर, वेळ असे अजुनी. '
आणि हादरुन गेली धरणीः हळू कुणी गर्जे
एके काळीं आम्हीं होऊं या इथले राजे.

# प्रत्यक्ष उभा बेडर हा चोर

प्रत्यक्ष उभा बेडर हा चोर
लुटितो धन आपुल्यासमोर.

खण खण खण खण यंत्र खणाणें
कालनिदर्शनिं चाले गाणें
समजुन तें नच घडतें घेणें
पातक हें होतसे अघोर.

पळापळांतुन जन्म घे घटी
तीच हिरेमोत्यांची कोठी
दवडूं आपण जर, तर तो लुटि
जो समजे तो एकच थोर.

पळापळांना जर रे खपवूं
कण कण उचलुन डोंगर हलवूं
कर्तव्या नच विन्मुख होऊं
बाप एकदा होता पोर.

उचल अतां तर माझ्या लाला !
उद्योगाचा एकच पेला
कैफ तयाचा येवो तुजला
हो त्या चोरावरती मोर.

# अज्ञातास

रे ! ऐस कसाही तूं कोणी
देव, दैत्य किंवा दोन्ही.

अजुन कधीं नच तुजसि पाहिलें
तूंहि कधीं नच रूप दाविलें
पण मागें तूं असशि हें कळे
कुठें असो मी जनिं विजनीं.

रात्र पडूं लागतसे जेव्हां
येसी दबकत थबकत तेव्हां
घालवावया माझा थकवा
करिसी कांहीं मधु करणी.

झोप म्हणा तिज म्हणा कांहिंही
मंत्रबद्ध मी जातों गुंगुनि
स्थिति बरवी ती वाटे अजुनी
स्वर्गसौख्यही तुच्छ गणीं.

तोच पुन्हां तूं येशी दापित
निद्रेतुन त्या मजला उठवित
खडबडुनी मी होईं जागृत
प्रफुल्ल ही दिसते धरणी.

नांगर बघतो वाटच माझी
बघे वाटही भाकर ताजी
कर्तव्याला मीही राजी
टाकिन शेती नांगरुनी.

खेळ असा हा नित्य अबाधित
कौतुकून मीही तो खेळत
सुखद संभ्रमामध्यें पोहत
झुलविसि तूंही दिनरजनीं.

# तरी अंतरिं मी पांखरूं उदास

तुझ्या स्कंधावर हेच हात होते
आणि तूंही ठेविशी आपुले ते
नाहिं कां मग वाटलें आपुल्याला
विरह केव्हांही नको व्हावयाला.

जरी अपुला हा मार्ग समुद्रांत
जरी वादळ गे, रोज रोज होत
रोज पडतो अंधार किति भयाण
नाहिं दोघेंही तरी उदासीन.

काळ आहे जरि धुक्याच्याप्रमाणें
प्रवाहांतच जरि कसेंतरी जाणें
भय न केव्हां तें वाटलें कुठेंही
स्वर्ग अपुल्या चित्तांत सदा राही.

आणि आतां जरि ऊन असे छान
असे सागरही शांत चहुंकडून
नाव माझी चालली सावकाश
तरी अंतरिं मी पांखरूं उदास.

दिवस तेव्हांचे असे आठवीत
स्मृती जागृत मज तीच दुःख देत
नसे पर्वा मज घोर तुफानांची
विरह तूझा मज सखे, फार जाची.

## वसंत

तूं दिव्य फुलोरा ! वसंत म्हणती तुला
सहज तूं जरी; येशि या घरीं, फुलवशील कोमला !

ही सृष्टि लागली उतरूं हार आपुले
किति तुटले फुटले आणि हिरे भंगले
हा वैभवनाशच शिशिर करी आपुले
कां तुजसि वघवते हीन दीन अवकळा.

हा ओढा हिरवंड म्लान पहा जाहला
बघ झुळझुळ त्याची हेंच प्रार्थितें तुला
घनराईंत पाहे तुझी वाट कोकिळा
कां आढेवेढे घागतात घ्यायला.

टवटवतिल राया, राया येतां घरीं
त्या घेतिल हिरवे शालू अंगावरी
फुलणार खरोखर जो तो अपुल्यापरी
तूं रम्य चितारी, उधळ रंग आपुला.

## खबूतरा !

गोड छबुकल्या खबूतरा
घुमत रहाः ऐसाच जरा
उंच मान कर ऐटीनें
मजसि बघूं दे मौजेनें
कितीक वेळां तुझ्याकडे
एकसारखें लक्ष जडे
विसरुन जातों मी मजला
आणि विसरतों काळाला
चोंच तुझी गमतीदार
डोळेही नाजुक फार
रंग तुझ्या त्या डोळ्यांचा
खरोखरिच रे गमतीचा
पंख किती नाजुक दिसती
निळे नीळसर तरी किती
पडक्या भिंतीचें दार
आवडतें तुजला फार
किंवा कमान विहिरीची
कौलें त्या छपरावरचीं
त्यांतच तुजला आनंद
घुमुघुमुनी घालिशि साद
शाळेला मी जातांना
शाळेतुन मी येतांना

दा. क्र. ८९३०

रोज पाहतों तुझ्याकडे
त्याचमुळें चुकतात धडे
उशीर होई त्याचमुळें
त्याचमुळें मज म्हणति खुळें
म्हणोत त्यांना काय कळे
सृष्टीचे आम्हींच कळे
लहानपण हें गमतीचें
लहानपण हें जमतीचें
हें न कळेही मोठ्यांना
मग कुठलें पंतोजींना ?
येशिल का रे खबूतरा
शिकवशील कां त्यांस जरा
नकोच पण येऊंस जरा
मिळेल मजला मार पुरा
गोड छबुकल्या खबूतरा
मी जातो माझ्याहि घरा.

# बाळा अशोका

हे गोड फुलांतील फुला ! लाडक्या मुला !
गेलास सोडुनी बाळा ! सोसून येथल्या कळा
विश्वास तुझ्यावर पुरा पुरा टाकिला
वाटलें मला ही काठी—मिळणारच टेकायला
त्या गोड स्मृती लाडक्या ! पुढें नाचती
तें चित्र फाडुनी टाकी जबरिनें जरी विस्मृती
मी ‘ अशोक ’ म्हटलें तुला लाडक्या फुला !
शोकांत परंतू हा मी—तो बाण असा उलटला
लोपला दिवस उगवतां न तो उगवतां
गेलाहि रवी अस्ताला : हें तसेंच झालें अतां
ही रात्र भयंकर पुढें उभी राहिली
डोळ्यांत अश्रुंच्या धारा पापणीहि भारावली
—ही माझी आणिक तुझी उभी बापुडी
डोळ्यांत आसवें आणी तो पिळवटुनी आंतडीं
ब्रम्हांड मला आठवे बघुन ही स्थिती
तुजविषयींच्या आशा पुनरपी घेरुं लागती
व्हा दूर अश्रुंनो अतां उगी भिजवितां
दिसणार कधीं नच माझा निःश्वास कधींही अतां
हो दूर आणखी तूंहि चिरडली कळी
जाणार आपणहि दोघें—ती वाट मळत चालली
चल काळा नाटक तुझें पुरें जाहलें
मज कळुनी आलें सारें हें कपट कटू आंतलें
हा असा उभा मी असें घेउनी हिला
घे घांस आमुचा मृत्यो ! पण दाखव आम्हां कळा.

# येणार घटी ज्या

येणार घटी ज्या अजुन पुढें
मन ओढे त्यांच्याचकडे.

दार धुक्याच्या मागें लपुनी
गाती दिक्कालाचीं गाणीं
धडपडतों पण येति न कानीं
लक्ष परी सगळें तिकडे.

नाव वल्हवीं त्याच दिशेनें
वळवुनही मी बसलों नयनें
उत्सुकतेनें अन् प्रेमानें
फडफडती पांढरी शिडें.

ज्याच्यासाठीं चाले धडपड
ज्याच्यासाठीं नित्य रडारड
ज्याच्यासाठीं इतुकी बडबड
अटोक्यांत तें मधुर घडे.

अमुचे आम्हां मिळावयाचे
दिवस गोजिरे दिसावयाचे
दुर्दिन मागिल विसरायाचे
स्वप्न असें मज रोज पडे.

मना माझिया भुता आंतल्या
उमलतील रे ! खरोखर कळ्या
बहरतील फुलतीलहि सगळ्या
नौबत बघ त्याचीच झडे.

# महात्मा

जग विलासांत रंगलें
तो तुरुंगांत तळमळे.

महालांतली दृष्टी कोती
गरिब झोपडीं निद्रेंतच ती
इतर बापुडे कष्टी खपती
हा एक वीर मनिं उले.

देशासाठीं ह्याचें जगणें
देशासाठीं ह्याचें मरणें
देशभक्तिचें अखंड गाणें
शृंखला तुटे त्यामुळें.

कोहिनूर हा नररत्नांतिल
अंगावर पण ह्याच्या वाकळ
यज्ञाची ही मूर्ती केवळ
जग पापांतुन उजळलें.

गुलाम आपण, स्वतंत्र हा पण
मरमर खपतो तरि रात्रंदिन
खालीं वांका शरमुन लाजुन
कां नाहिं हृदय भंगलें.

धूळ जगाची ह्याच्या भाळीं
तुडवी कांटे पायांखालीं
ही पण जाणिव अम्हां न पटली
हा जीव म्हणुन हळहळे.

# नवें वर्ष

नवें वर्ष ये इंग्रजी आजला
भला हात हातीं तयाच्या दिला
मुदें कौतुकानी मला तें पुसे
' गड्या ! रे तुझें सांग चाले कसें ? '

' असे ठीक व्यापार धंद्यामधें
रमें त्यांत मी तोच आनंद दे
जगाच्या कशाला फिकीरी करूं
नको त्या कशाला जिकीरी धरूं ? '

जुनें वर्ष मागें उभें : हांसलें
मला हांसणें तें पुरें बोंचलें
लपंडाव माझा तयें जाणिला
न जाणूं दिलें आजला त्याजला.

नवें वर्ष ये तें मलाही नवें
तयालाहि मी हें नको सांगणें.
नवें वर्ष येणार माझ्यासवें
मला प्राप्त झालें खरें वागणें.

असे लाभ मोठाच हा जाहला
नवें वागणें प्राप्त झालें मला.
जुन्या सोबत्या मी दुवा दें तुला
नवें वर्ष आधार मोठा मला.

# कविता

चुरगळूं नको राजा ! कपटा
आंत त्यांत आहे कविता.

म्हणशिल म्हण छांदिष्ट मला तूं
म्हणशिल म्हण भ्रांतिष्टहि मज तूं
अव्यवहारी किंवा म्हण तूं
निराळयाच माझ्या वाटा.

असेल ती माझ्या तांब्यांची
किंवा केशव–सुत शूराची
किंमत तुज नच कळावयाची
धन दौलतिचा तो सांठा.

जे माझे आनंद जाहले
सौख्यकुंभ ज्यांना मी गणिलें
नव युग ज्यांनीं स्वयें निर्मिलें
काय तुज कथूं आडमुठा.

आण चिटोरीं मज जोडूं दे
डोळे भरुनी तीं वाचूं दे
नवा स्वर्ग मज त्यांत बघूं दे
तूंहि पहा माझे बेटा.

शांतीचें साम्राज्य यामधें
स्फूर्ति आणि चैतन्य यामधें
अभ्युदयाची वाट यामधें
प्राशूं अमृत घटा घटा.

# त्यानें मग फेंकून

त्यानें मग फेंकून दिली जिन्नस खालीं
लोभावुन पृथ्वी उचली आतुरलेली
आकारुन—पोलाद—दिलें नांव तयाला
आनंदुन पृथ्वी वदली : 'देवच वाली'.

त्याचे मग त्यांनीं तुकडे तीनच केले
जो तो वदला यांतच जादू भरलेली
तर्वार करी एक, दुजा गोंडस बेडी
आश्चर्य करी देव : टिपें दोन गळालीं.

तेथेंच उभी एक कुणी व्याकुळलेली
घेई तिसरा भाग हळू आणि पळाली.
त्याला घडुनी ती बनवी नांगर फाळा
तो देव मनीं खूष फुलें फेंकित खालीं.

## विनवणी!

फडफडत पंख पांखरू न त्या आसरा
धडधडत हृदय हें माझें आटेल आंतला झरा.
हांसणें मुखीं झळकतें
अंतरीं हृदय करपतें
पडतात सारखी क्षतें
फिरत भोंवरा.
दगडाच्या मूर्तीपुढें
उघडतां हृदय बापुडें
पाझरून जाती तडे
भारली धुरा.
कोठल्या वनी मी शिरूं
वठलेले भवतीं तरूं
वणवणूं किती अन् फिरूं
असा घाबरा.
वणव्यांत तरी ह्या पण
घडिभरी तुझें दर्शन
देई नव संजीवन
फुलें मी पुरा.
विनविलें तुला जावया
मजपासुन दूरावया
पण 'कविते' करुनी दया
देइं आसरा.

## मायभूमी

ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरीं
जननि गे, तुझें
श्रीहरीपरी
मधुर नाम घुमघुमतें सतत हृदयमंदिरीं.

काल तुझे वीरमणी
चमकले रणांगणीं
आणि आज तेच गुणी
दास आपुल्या घरीं.

दाटुनियां येत गळा
पाहतां अशी तुला
भासतसे कीं मजला
खुपसली उरीं सुरी.

शांति धरिलि आजवरी
क्लेश होति अंतरीं
जीव हाय हाय करी
डागण्या कितीतरी.

तनमनधन तुज जननी
होय मुक्त अर्पुनी
देह पडो तव भजनीं
आस पूर्ण ही करीं.

मूर्तिमंत ऐश्वर्य हिंदवी भूषण भूमंडळा
शिरीं धरी कैलास झळाळे गौरवर्ण मेखळा
हिमालया तूं ! मायभूमिचा माझ्या केवळ ध्रुव
रोज नवा वाल्मीकी जरि ये न पूर्ण गुणगौरव
तुझा खडा जागता पहारा अखंड एकीकडे
तिन्ही त्रिकाळीं तिन्ही बाजुंला समुद्र दुसरीकडे
भरतखंड सोन्याची पुतळी त्रिखंड कीरत भरे
सरस्वतीचे लाल उभविती तिचीं यशोमंदिरें
तिचाच भू–विस्तार पसरला पहा दक्षिणेकडे
दऱ्या आणि खोऱ्यांची भूमी कडेच चोहोंकडे
आणि पठारी तिचे लाडके पाइक पुरुषोत्तम
जयजयकारासाठिं तियेच्या रोविति विजयि द्रुम
लाख हिरे ओवाळुन टाका असा तयांचा धनी
महाप्रतापी प्रभू शिवाजी उदार वीराग्रणी
महाराष्ट्र हा केवळ त्याचा दुसरा परमेश्वर
नाहिं असा कुणि भक्त जाहला नश्वर धरणीवर

महाशूर महशूर जाहले होउन गेले किती
परी प्रभू शिवराय आमुच्या धर्माचा सारथी
सद्धर्मप्रतिपालक म्हणजे भाग्यवंत हा हिरा
सुराज्य आणिक स्वराज्यसंस्थापकांतला मोहरा
क्षेत्र द्वारका दूर योजनें अनंत येथुन जरी
महाराष्ट्र हें तीर्थ करी श्रीप्रतापगड-केसरी
आज पुन्हां अवतरे पहा नृप त्या, पाषाणावर
सर्वभक्ष्य कलिकालाचेंही तोडुनियां अंतर
काय नवा होणार कळेना चमत्कार ह्यापुढें
रूप नवें घेऊन आजला असे राहिले खडे
मनीं माझियापुढें पसरलें जरी तमाचें धुकें
भविष्यद्वारांतुनी पाहतां ‘ कांहितरी ’ लकलके
लकलकतें लकलकतें आहे मुजरा त्याला करा
रायाच्या राज्यास साजिरा सोन्याचा उंबरा
महाद्वार मोत्यानें मढवा चढवा तोरण कुणी
डौलदार जरिपटका द्यावा रायाचा रोवुनी
हादरते खालती धरा कां तेज उफळतें पुन्हां
जुन्या तरूवर नवी पालवी येवो नारायणा !
मूर्तिमंत ऐश्वर्य येतसे या हो सगळेजण
खडा शिपाई तुमचा भाई घ्या राया वंदन.

# सरदार धन्य एवढा

धडधडां झडे चौघडा, गडावर चढे मर्द फांकडा.
अवघड गड अस्मानी डोले
वरती बघतां फिरतिल डोळे
खालीं पाताळांतिल इमले
आसऱ्यास बाजुस कडा.

अजुनि तांबडें नाहीं फुटलें
फटीफटींतुनि गवत कोवळें
वाऱ्याच्या झुळुकेनें हाले
शोभतो दंवाचा सडा.

हातांतिल तल्वार ठिबकते
पाठीवर वाघीण नाहते
'करील कौतुक ती' मन वदतें
चालला शिपाई खडा.

गडावरुन खिडकींतुन कोणी
एकसारखी टक लावोनी
बघे स्वारिला डोळे भरुनी
सरदार धन्य एवढा.

# नवलाख झुले लष्कर

नवलाख झुले लष्कर, तळपे भाला वरच्यावर
दिसतें एकच वर अंबर
खालीं सैन्याचा सागर
नाहीं नजर ठरत त्यावर
जरिपटका डौलांत डोलतो भरजीर हत्तीवर.

हौदा सोन्याचा सुंदर
वरतो मोत्यांची झालर
भाऊ—दक्षिणचा भास्कर
स्वर्गीचें सौंदर्य लोटलें ह्या तर सैन्यावर.

बक्‌मार चमके तल्वार
रणमस्त तुफानी स्वार
गर्जती "महादेव हर हर"
रोखून चालले पानिपतावर पुण्यपत्तनेश्वर.

कडाडा वाजतसे तंबुर
कांपे तो मोगल थरथर
मऱ्हाठी थोर थोर वीर
पुण्यवंत श्रीमंत पेशवे विजयी होणार.

# कालचा मराठा

आडदांड अडमूठ मराठा नांव गांव रांगडी
रायाच्या रक्तास जागवी जंगलची घोंगडी
बीज असें श्रद्धेचें, नाहीं उगिच भाट बोलका
विजयपताका म्हणुन फडकवी मराठाच शेलका
साक्ष द्यावया वाहत आहे निर्मळ गोदावरी
प्रतिपाळित लाडक्या शिवाचा मुलुख धीट डोंगरी
धार पिउन जागला मराठा, आग पीत ये पुढें
मृत्यूला कवटाळित तिकडे घोरपडीवर चढे
वृक्ष लता पाषाण येथला म्हणुन धन्य जाहला
शूरांचा वीरांचा येथें अखंड पिकतो मळा
प्रतिवर्षीं भरतसे येथला मोत्यांनीं जोंधळा
गोदेच्या कांठचा कृपाळू मुलुख जगावेगळा
तिच्याच काठीं तिची भाकरी टांगुन पाठीवर
खुल्या दिलाचा फिरे रांगडा रायाचा चाकर
—आणि घरींही थाट आगळा लक्ष्मी सेवा करी
अखंड धरितो छत्र आपुले पंढरिचा श्रीहरी
भावभक्तिचें कौतुक करितें त्रिखंड जग घोषुनी
रायगडावर प्रभू चमकती अपुल्या सिंहासनीं
लाल भडक तांबड्या मातिला श्रीगोदेचा लळा
मर्दाची पाटलीण राखी घरामागचा मळा
' हुर्र हुर्र ' सारखा चालवी गोड मंजुळ ध्वनी
उंच उडे पाखरूं चपापुन कणसाकणसांतुनी

जादूनें भारली तिच्या ती चालविते गोफण
कसा दगड लागेल कुणाला मायेचें कुंपण
नाजुक अन् हळुवार मराठी ठेवण आहे जुनी
वाघिणिच्या क्रौर्यास लाजवी चावा घेतां कुणी
पलीकडे फुरफुरते घोडी पारंबीच्या बनीं
नशिबाची म्हणतात शिकंदर तिला पाहतांक्षणीं
हिर्ने असे पाहिली पोहिली अनेकदां नर्मदा
रायाच्या राज्यांत सुखाचा सदा झडे चौघडा
चहूंकडे चौकांत चमकती तरुण बांड फांकडे
कोण कसा पाहील वटारुन डोळा त्यांच्याकडे
तिन्हीकाळ तल्वार लटकते घरच्या ओटीवर
घुमे ध्वनी मुलुखांत मराठी ‘ महादेव हरहर ’
चहूंकडे नांदते सुबत्ता सुराज्य साधेंसुधें
चहूंकडे पौरूष खेळते तेज नवनवें चढे
नांव गांव रांगडी, शिवाचा खास मुलुख रांगडा
त्याच गांवचा कवी मराठी, मुजरा त्याचा खडा.

*   *   *

नशीबीं पाहणें मागें
आलें आज पुन्हां पुन्हां
लागले वार जे तेव्हां
त्याच्या शाईत या खुणा.

# आजचा मराठा

गंजला
आणि गांजला
मराठा पुरता
शरिरास लागला विस्तव कढतां कुढतां.

ना मिती
खपावें किती
सतत शेतांत
दे पीक न धरणीमाय उभ्या वर्षांत.

भाकरी
भुकेला तरी
कशाची भाजूं
हृदयाचे झाले उलटे मात्र तराजू.

सांभाळ
आणि प्रतिपाळ
करावा कैसा
गोठ्यांत गोजिरी चार, गळ्याला फांसा.

पाटील

पगडिला पीळ

आमुच्या साजे

ह्या ह्याच गांवचे राजे, आजे पणजे.

त्या तिथें

आमुचीं भुतें

भटकती आतां

हातांत घेउनी हृदय बोंचतो कांटा.

भंगून

आणि खंगून

ह्यामधें अंत

नशिबांत कंठणें आली काळी रात.

ही रात

मनाला खात

कशी जाणार

तो कोण कधीं येणार दाद घेणार.

# उद्याचा मराठा

तडफडतो तडफडतो आहे जीव, होय काहिली
ओढ कशाची आज नव्यानें ह्यास अशी लागली
इथें रमेना तिथें रमेना रुचे न कांहीं कसें
भ्रमिष्ट म्हणतिल कुणी, जडे पण जिवंतपणचें पिसें
आंत कोण वाहतो त्यामुळें हृदय लागलें कढूं
पंख कापले परंतु पाहे अवघड घडही उडूं
साधुन घे हकनाक वैर हा भंवतीं गोतावळा
अंतरिं त्याच्या सूर्य म्हणतसे—'आलों उदयाचला'
जीवाच्या होतात चिंधडया प्रतिपळ जातो फुका
वाजवून घ्या नाणें हा तर शिवरायाचा रुका
चिरंजीव हा, चिरंजीव हा ! शूर मराठा गडी
समर्थ हा, घेईल एकटा आघाडीची उडी
नको आडवूं मार्ग तयाचा माझ्या भुरटया जगा !
काय सांग घेशील घे तरी दाम बसाया उगा
धन्य धन्य होणार हिंदवी कूस याचियामुळें
वेलीवरच्या कळ्या आजच्या तीच उद्यांचीं फुलें.

# शांति आणि संपत्ति

जा येथुनी दूर—तुझी शिसारी
—ये द्वेष वाढे तुझिया कृपेचा
जें जें दिसे दुःख धरेवरील
तेथें तुझा हात दिसे विखारी.

बागेंत ह्या जो उडतो फवारा
किंवा फुलांची फुलबाग हांसे
मागें तयांच्या बघतां भयाण
पाहीं तुझें रूप, फुले निखारा.

हातीं धरूं चालविण्या हत्यार
तेव्हां तुझा स्पर्श जनांस व्हावा
रक्तास तूं पूर्ण हपापलेली
उद्विग्नता जागवि ह्या विचार.

ज्यांना हवी गोड तुझी भलाई
त्यांनी चिरावे जन जे गरीब
त्यांच्या चितेच्यावरच्या फुलांचें
काढा लुटा अत्तर सौख्यदायी.

मातीस आधीं मिळवा अशांना
हातीं जयांच्या चमकेल सोनें
दैना खरी हे करितात लोकीं
शांती प्रभूच्या मग लाडक्यांना.

# कुठें जाशी ?

अहा ! हिरव्या हांसऱ्या वैभवांत
खुले सृष्टीचा रंगदार थाट
किरण कोमल खेळते हांसवीते
फुलेंवेलींना फूल—पांखरातें.

हिऱ्यामोत्यांनीं लवथवते सृष्टी
जणों रत्नांची होय दाट वृष्टी
खुले सृष्टीचा मोकळा महाल
तोषवीतो जगतास तिन्ही काळ.

—आणि खेडें बाजूस नदीकांठीं
गर्द वृक्षांची सभोंवतीं दाटी
असे इतुकें जरि तरी तें उदास
आठवोनी आपुल्या वैभवास.

कुण्या धनिकाचे लोभविण्या डोळे
काय गेलीं येथून हिचीं बाळें
मुला ! इथल्या हळहळे घरीं आई
कुठेंही जा सुख तुला ‘ असें ’ नाहीं.

लोभ पैशाचा फुक्या वैभवाचा
नाश करितो रे सृष्टिच्या सुखाचा
इथें आहे तुजपुढें हा निसर्ग
कुठें जाशी सोडून खरा स्वर्ग.

# हिरकणी

सकल कलासंपन्न लाडकी गुणखाणी निस्तुळा
कधीं कधीं चमकून जातसे न दिसे माझें मला
न दिसे माझें मला हिरकणी येतां माझ्या घरीं
येतां माझ्या घरीं थरारुन वृत्ति करी बावरी
मन बावरतें तन बावरते हादरतें अंतर
आनंदाच्या भिन्न कल्पना मोहरती क्षणभर
विलक्षणच हें ! विलक्षणच हें ! काय नांव तरि कसें
नका पुसूं कवणास, मानिनी करील अवचित हसें
क्षणांत क्षितिजावरी चमकुनी जाते विद्युलता
तेज भरे नेत्रांत संचरे तिचीच तेजस्विता
गुरफटुनी भावनेंत गुंगे हिकडे तिकडे मन
तरंगतो गगनांत ढग पुढें अमर्याद अंगण
ज्यांकरितां चालते जिवाची धडपड तळमळ म्हणा
शब्दांचें सौंदर्य लेवुनी उमटविते ती खुणा
धगधगलें स्थंडील तोंवरी उठोनि उधळी फुलें
अंतरिंच्या कविराया ! गा गा हृदय करोनी खुलें
अमर्याद जग तुझ्यापुढें घे पसरे हें पाहूनी
जगास दे जें तुझें ज्यामुळें जग जावें गुंगुनी
ही जादू शब्दांची उचलिल पंखावांचुन धरा
भाग्यवंत लाडकी येतसे चालुन माझ्या घरा.

# तिचे बाबा

घरीं जा त्या आनंद बहरलेला
दिसायाचा तो नेहमीं तुम्हांला
मधूदादाची बहिण कमूताई
तिचेवांचुन करमे न कुणालाही.

तिनें पुरते नाहींत पाहियेले
अजुनि कैसे ते तीन पावसाळे
बालबुद्धी पण कळे सर्व कांहीं
बाहुलीचें ती लगिन लवितेही.

झोंक पाहुनि घ्या तिच्या परकराचा
नोंक पाहुनि घ्या तिच्या चालण्याचा
नवी तसबिर माडींत टांगलेली
पहाण्याची तर पहा तिची शैली.

जणूं तिजला कळतेंच सर्व कांहीं
अशा थाटानें बघत उभी राही
ओळखीचा चेहरा दिसे तीस
तिचे बाबा ते—सांगणें कशास ?

कितीदां ती आईस हांक मारी
म्हणे चल गे दावीन मौज सारी
मधूदादानें असे आणियेला
पुन्हां बाबाला चलच बघायाला.

' पुन्हां बाबाला चलच बघायाला '
शब्द साधे हे वदुनि जात बाला
माय तीची दुःखिता वदत नाहीं
अश्रुंवांचुन दिसतें न तिथें कांहीं.

# पर्वती

ही पुण्याचीच पर्वती
मनिं विचार येती किती
तें पुणें—काय ही स्थिती !
निशाण जाउन काठीसाठीं आम्ही मरतों किती.

हीं उंच उंच देवळें
मन बघतां बघतां झुले
ते दिवस अतां कोठले
अस्त जाहला घुबडें तेथें अशुभ काढिती गळे.

हे भयाण वाडे जुने
त्यांतून भुतें भटकणें
नववैभव हें मानणें
धन्य धन्य त्रिभुवनांत ऐसा डौल पुन्हां मिरविणें.

वनराइ नटे भोंवतीं
ह्या मुळा—मुठा वाहती
ही धन्य धन्य पर्वती !
जरिपटका पण स्वजन तुडविती म्हणुनि मनीं खिन्न ती.

हे भाट अम्ही केवळ !
शब्दांत आमुच्या बळ
अंगांत केवढा पिळ
हाय झालि घरकुलांत भाकर दुपारची दुर्मिळ.

हा निजलेला ' दक्षिण '
जातिवंत केसरी पण
उगवणार लवकर दिन
नव्या युगाला स्वातंत्र्याचें हा बांधिल तोरण.

# गु. अण्णा कर्वे

तेव्हां—तूंच म्हणून निर्भयपणें हें रोपटें रोविलें
पाणी सांजसकाळ घालुन तुवां त्यातें दिलें जीवन
झंझावात कधीं सुटे मग तुझी आपूलकी धाउन
—जाई; आणि करून ढाल अपुली सप्रेम संरक्षिलें.

वर्षांमागुन वर्ष जाय नव ये तेजस्विता त्यांवर
होई चित्त पुन्हां प्रसन्न बघुनी ही लाडकी संपदा
शांती सौख्य विरंगुळा हिजमुळें लाभे मनाला सदा
अंतर्बाह्य सदैव कष्ट करिसी दुःखांसही तत्पर.

कोणी दूषणही दिलें न तिकडे दृष्टी वळे निश्चळ
सेवाधर्म असा विलक्षण तुझा वाढे यशाचें बळ
घेसी एकच ध्यास आणि खपसी तेथेंच रात्रंदिन
कीं कीर्तिध्वज हाच ठेविसि जणूं तूं त्या स्थळीं रोवुन.

आतां वाढुन रोपटें दिसतसे तेथेंच दृष्टीपुढें
ज्ञानाचा वटवृक्ष थोर, भगवें सत्कार्य हें केवढें !

फूल माझ्या शेवंतीचें डोले अंगणीं
फुले अंगणीं
डौल माझ्या बाहूलीचा पहा ग कोणी.
वेणी केव्हां गुंफूं बाई
वेळ मला मूळीं नाहीं
बाहूलीला सदा घाई
मोठी शहाणी.
डोळे किती वटारते
नाक कशी फेंदारते
गाल बुद्‌ध्या फुगवीते
राजाची राणी.
हिच्या गळां हिरे मोतीं
डौल त्याचा हीला किती
उभ्या मैत्रिणी भोंवतीं
म्हणाया गाणीं.

# उघड उघड

उघड उघड दार रे ! दया करून आपुलें
जावयास आपुल्या घरांस जीव तळमळे.

यावया तुझ्याकडे
आडवे उभे कडे
रोखितात बापुडे
तूंच स्पर्शतां दुभंगतील तें न त्यां कळे.

सूर्य रोज उगवतो
धरणिला प्रकाशितो
अंध त्यांत मीच तो
प्रकाशमान वाट मात्र तेवढी तुझ्यामुळें.

प्राणिमात्र एकटी
पोशिते वनस्पती
मी भुकाच शेवटीं
सावलींत तृप्तता तुझ्या कधीं कधीं मिळे.

हृदय सरळ कोंवळें
दुःख मात्र त्यामुळें
विव्हळे जळे उले
आसऱ्यास ज्यांचिया सुखांत तेंहि चाललें.

मोकळा दिसे जरी
बंदिवान हा तरी
घेउनी शिळा शिरीं
ओसरीवरी तुझ्याच देह फेकितो बळें.

एवढीच प्रार्थना
एवढीच याचना
शेवटीं दयाघना !
पूस आंसवांस पितृहीन बाळ तळमळे.

# उलटल्या उरांत कट्यारी

ऐरावत झुलती द्वारीं
तो त्याच महालिं भिकारी
गणगोत जाहलें वैरी
उलटल्या उरांत कट्यारी.

रणदेवि काय कांचली
त्याच पाउलीं
गेलि माघारी.

घरभेद धर्म जाहला
कापती गळा
खुशाल दुपारीं.

श्रीमंत मातले किती
गरिब थरकती
नाहिं कैवारी.

शाबूत रूढिचें तख्त
चहुंकडे भक्त
राज्य अंधारी.

आजला म्हणुनि हा फांस
लागला श्वास
उडे उर भारी.

# चौघडा

सार्वभौम सम्राट गडांचा अवघड गड डोंगरी
दक्खनच्या तक्तास कोंडणा धरी उभारुन शिरीं
शिरीं धरी तक्तास खालती लाल रंगला सडा
पहाटच्या प्रहरास तयाचा आठव दे चौघडा.

चहूंकडे घनगर्द खालती माजे आंबेवन
उंच जांभळी करवंदीचें करिते संरक्षण
करून ' आ ' विक्राळ आपुली दाढ दणाणे दरी
भयाण अन् भेसूर श्वापदें क्रूर तियेच्या उरीं.

चपापून त्या घळींतं कोठें दडून वाघिण बसे
वाघ भयंकर तिचा लाडका पाणथळीवर दिसे
जंगल हें सृष्टिचें, कोंवळे स्वरूप कुठलें इथें
भयाणता माजली भयंकर डाकिण खेंकाळते.

तशांतही झुळझूळ चालते—झरे बाजुला झरा
लाडिक अन् लडिवाळ पांखरां जंगलचा आसरा
शौर्य वीर्य निस्तेज व्हायचें येथें येतां कुणी
झऱ्याकडे पाहून रमावें खुशाल गुंगत मनीं.

प्रदेश हा मऱ्हाठी ठेवण बाहिर कणखर जरी
अंतरंग आंतील कोंवळें घुमे मधुर बांसरी
वेळ आज रोखून रायबा जंगलचे जाणते
शिकारीस हेरून बैसले पहाटचे ह्या इथें.

उमर अजुन कोंवळी सावळें शरीर बावनकशी
ओठांवर शोभते वयाच्या उमेदींतली मिशी
कमरेला तल्वार लटकते भाला बाजुस उभा
डौलदार ढालीस न्याहळी रानफुलांची सभा.

न्हाणतात तेजस्वी डोळे चमके आंतिल हिरा
समोरून वाघीण फडांतुन पाहुन दचके जरा
हातांतिल बंदूक सावरी, रोख मस्तकावर
मंगलमय धडधडे चौघडा दूर गडाऱ्यावर.

ही वेळा सोन्याची आहे प्रभात उधळी प्रभा
रायाच्या रानांत रायबा मुजरा द्याया उभा
मुजरा द्याया उभा रायबा लवे शीर खालती
समोरून वाघीण डरकते नसे तयाला क्षिती.

वंदन शिवचरणाला आधीं प्रतिपाळी जो धरा
हृदय मराठी : अशि न जाहली भूवर भाविक तऱ्हा
दिवस उगवला पुन्हां ! तळपतो नारायण अंबरीं
दिवस उगवला पुन्हां, रायबा गेले वरच्या घरीं.

वाघिण ती तर क्रूर, कशाची पर्वा तिजला तरी
वीर रायबा कसची पर्वा मृत्यूला घे उरीं
आणि संपला दिवस आजला रात्र मात्र किंचळे
शहर पुण्याचा कवी उधळतो दिव्य हिऱ्यावर फुलें.

# कोकिळे !

गडे ! तूं उडुन जाइं कोकिळे !
खरोखरिच मी दार टाकिलें सताड उघडें खुलें.

माळरान हें खडक सभोंतीं
पलीकडे करि डोंगर वसती
क्षितिज टेकलें त्याच्या माथीं
न ओढा इथें कधीं खळखळे.

थंडीनें थंडींत कुडकुडे
उन्हाळ्यांत भाजून तडफडे
पावसांत तर गळत झोंपडें
कशी तूं रमशिल तेथें खुळे ?

तुझिया संगीतास भुकेलें
जग तें, येथुन दूर मंगले !
आणि इथें मी, अश्रूंत उलें
होतसे शरिर रोज खिळखिळें.

जवळ न माझ्या द्याया कांहीं
हृदय देउं तर जळतें तेंहीं
वाणी ही बदसूरच गाई
दिलरुबा बोल बोलतो बळें.

तुझिया पंखावरती भवतीं
स्वर्ग नवे सारखे तरंगाति
सहवासें माझ्या ते कष्टी
शिंपितों मी अश्रूंनीं मळे.

जरि माझ्यास्तव इथें राहशिल
नक्षत्रें ताराही ढळतिल
आजुबाजुचे डोंगर तडतिल
अहा ! मी मरतों मज हें कळे.

# बाळ पांखरा

रानामधलीं चार पांखरें जमलीं झाडावरती
मंजुळवाणें गीत गोजिरें गाती हसती रमती
हिरवा पिवळा रंग लोभवी डुलते मुदें डहाळी
रमतो आहे खास ह्या इथें वनलोकींचा माळी
रम्य मनोहर इथलें सगळें कृत्रिमतेस न थारा
फुलांफुलांतिल सौरभ लुटुनी वाहे इथला वारा
हिरवें हिरवें गवत कोंवळें खुशाल तुडवा खालीं
किंवा लोळा, तुमच्यासाठीं पुढें फेकिल्या शाली
नेत्रांनों ! घ्या खुशाल लुटुनी ऐश्वर्याची माया
न मिळायाची पुन्हां कधीं ही दवडा संधि न वाया
इथलें सगळें तुमचें आहे नाहीं भेद न भाव
सृष्टिदेवता तुम्हांस बाही असा रंक वा राव
निसर्ग इथला मोहक, येती फिरती लोक अनेक
मोहरून आनंद येथला डुलवी जन प्रत्येक
परंतु कोणी दुष्ट पारधी बघे इथेंच शिकार
गोड गळा मैनांचा इथल्या मोहवि त्यातें फार

आणि वाटलें तयास कांहीं, विचार जमले भवतीं
अविचारानें आणि उडविली त्यानें बंदुक वरती !

* * *

बाळ पांखरा ! आलों आलों कवटाळाया तुजला
तुझ्यासारखें असेंच कांहीं झालें आहे मजला
कळलें मजला दु:ख, काढुं दे छरा तुझ्यांतुन जल्दी
निसटुन गेला शूर पारधी शिकार टाकुन अर्धी
असो—काय हें ! केलिस तूं ही पंख आपटुन घाई
त्रिभुवन मजला वाटे खातें, नच बघवे मज कांहीं
हर ! हर ! इतुकें दुष्ट असे कां जग हें गोजिरवाणें
ज्याच्यामध्यें आपण गातों स्वार्थ होमुनी गाणें
असो ! पाजितों मी शेवटचें तुला अश्रुंचें पाणी
मला परंतू पाजायाला नको येथला कोणी.

# माझी वेल

—आणि साधी ही वेल नदीकांठीं
करी पुष्पांची कधीं कधीं वृष्टी
क्वचित् दिसतो मज भृंग त्या ठिकाणीं
जुनें जोतें बाजूस समाधानी.

दगडधोंड्यांचा सुखद वास हीस
हिच्या कवनांचा गंध ये तयांस
मंद साधा सौगंध इथें खेळे
तिच्याभोंतीं पावित्र्य जणूं डोले.

हिच्याभोंतीं पावित्र्य असें खेळे
दूर येथुन जग म्हणुन उभें ठेलें
जगा ! संपत्ती हीच तुझी शांती
जाळ आम्हाला आणि करीं तृप्ती.

कधीं येतों मी इथें दुःखमग्न
कधीं येतों मी इथे भग्न भग्न
वेल माझी ही सोनुकली छान
मला माझें देतसे समाधान.

—म्हणा ‘ सिंहासनिं तुला बैसवीन
हिऱ्या मोत्यांनीं खचिन लवथवीन
आणि उधळिन तुजपुढें सर्व कांहीं—’
तरी तिकडे मी अतां बघत नाहीं.

वेड मजसी लाविलें फिरफिरून
अशी माझी ही वेल घे बघून
मला माझें तर सांपडलें सारें
लाव आतां जा जगा ! तुझीं दारें.

# महात्मा

—आणि त्याला जा करा बंदिवान
दगडधोंड्यांचे रुंद तट रचून
बिड्या त्याच्या पायांत तुम्ही घाला
मोकळा तो—अडवील कोण त्याला ?

गडद अंधारीं रहायास खोली
उभ्या रोखा संगिनी भोंवतालीं
हिमालय तो—तो अचल राहणार
शांततेची मूर्तीच निर्विकार.

पहा—त्यालागीं तुम्ही तपासून
निराळा तो भासेल जगाहून
जनांची पण काळजी त्यास जाळी
हृदय-स्थंडिल धगधगे सर्वकाळीं.

शरिर त्याचें तें जणूं वाळलेलें
गवत वाऱ्यानें मधुन मधुन हाले
साक्ष इतुकी—ह्याहून नसे कांहीं
श्वास त्याचा पण धरा हालवी ही.

मातृदेशाचें चित्र मूर्तिमंत
बघा अपुलेंही हृदय असे ह्यांत
जीव त्याचा जीवांत गुंतलाहे
थोर ह्याहुन जगतांत कोण आहे ?

## भविष्य ये जन्मास

घडवितों काय हें मज न कळे
पण घाव पडे उडती छकलें.

शरिराला नहि माझ्या डोळा
उणीव भासे पळापळाला
उठाव साधूं कसा ह्यांतला
दैव साह्य दे मज अपुलें.

हातांतिल हातोडा बाका
दे दगडावर नीट तडाखा
ये माझ्या पण मनांत शंका
भरूं कसें जळ, रितें तळें.

झोंप न ये जागेपण आलें
आजुबाजुला जग उतावळें
म्हणे 'खूळ ह्या पुरें लागलें.'
खरेंच हें आहे सगळें.

हात गुंतला हातोड्यावर
चित्त कळेना जडे कशावर
कळतें कीं तडफडतें अंतर
जें घडे तयावर मन रमलें.

अंतर्यामीं पण मज कोणी
म्हणे—पांखरा, जा गा गाणीं
भविष्य ये जन्मास यांतुनी
घाव हाण, होणार भलें.

# जशी वृत्ती त्या फूलपांखराची

जशी वृत्ती त्या फूलपांखराची
सतत गुंगत रानांत रहायाची
त्यास कांहीं नच सांज वा सकाळ
फुलांमधुनी तें उडतसे खुशाल.

तसा मीही या मोहुनी जगाला
असें रमवित ह्या माझिया मनाला
कधीं काळीं येणार जें जगांत
तेंच गुणगुणतों गीत मी मनांत.

जगाचा मी बांधला दास आहें
आणि आनंदुन जगाकडे पाहें
निसर्गाचे पडसाद ऐकुनीयां
गुंगतें मन, लागतें सहज गाया.

जगीं ज्याला म्हणतात विजनवास
स्फूर्ति तेथुन ही लाभते अम्हांस
निसर्गाचें गाणार आणि गीत
अम्हां लाभे आमुचें निसर्गात.

—आणि जेथें लाभतें असें कांहीं
सहज वृत्ती ही रमुनि तिथें जाई
दंग आम्ही मग नवें नवें गाऊं
आणि गाउनियां तुम्हां वेड लावूं.

# फेका फेका भाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा.
वा. नं.
ता.
टा क्र.

एकला
वनीं मोकळा
स्वैर तो होता
दशदिशां दरारा त्याचा, कसली चिंता.

चळचळां
बघुनि त्याजला
कांपती क्रूर—
उन्मत्त श्वापदें—हा हिकडे गंभीर.

तें रान
सुखाचें स्थान
जगाहुनि प्यार
त्याहून इतर जें, तें तें कारागार.

तेथला
झरा मोकळा
वाहतो त्यांत
प्रतिबिंब पाहुनी सहज गर्जना करित.

निःशंक
कशाची अटक
त्याजला घडते
तो राजा जिकडे जाइल तेथें तेथें.

ते दिवस
कधीं उपवास
घडुनिही त्याला
वाटले सुखाचे त्या मानी सिंहाला.

गर्जना
कधींही पुन्हां
तयें नच केली
उघडून पहा तें हृदय पेटली होळी.

खंगला
मृत्युची कळा
तयावर आली
हा खराखुरा वनराजा वैभवशाली.

•

झडकरी

तुम्हीं त्यावरी

भिकारी भाला

फेकून पहा–तो उत्सुकला मरणाला.

दिनरात

त्यास जाळीत

दुष्ट परवशता

जी अम्ही भोगितों तुकवुन अमुचा माथा.

सत्वरीं

म्हणुनि घ्या करीं

भिकारी भाला

तो उत्सुक झाला पहा खऱ्या मरणाला.

तुझ्याच नजरेमधें सांठली इतुकी जादू कशी
नकळत गेले भारुन म्हणुनी ओढ लागली अशी
कातरतें रे राया ! माझें अंतर वेडें पिसें
कळेल जर कां तुज, मज वाटे होइल माझें हसें
रोज पाहतें तुला न्याहळिन झटकन् म्हणतें मनीं
परंतु माझी मीच लाजतें तुजला बघतां क्षणीं
अम्ही मराठी सरदारांच्या थोर कुळातिल मुली
गडमाथ्यावर स्वैर हिंडणें शोभत नाहीं मुळीं
(१) रोज तुझी घोडीवर चाले दौड इथुन पाहतें
सोन्याच्या पिंजऱ्यांत मानी मैना झुरते इथें
भाग्यवंत कुलदैवत अंबा पडेल तिज सांकडें
ह्याच गडावर तुझ्याचसाठीं झडतिल मग चौघडे
तोंवर लोटूं कशा, निष्ठुरा ! दिवस आणि यामिनी
उगाच कांहींबाहीं भकती भवतालीं मैत्रिणी
जखम जाहली उरीं माझिया औषध तुझिया करीं
दूर गडावर मैना झुरते ठेव आठवण तरी.

# कमला

नांवगांव पालटलें आतां ‘ कमला ’ म्हणती मला
देवधर्म साक्षीस ठेविले त्यांचा लागे लळा
सोन्याच्या पिंजऱ्यांत होती मैना, केली खुली
रानपाखरा ! तुझ्याच नजरेमधली मी बाहुली
राया ! अगदीं प्रमाण धरती तुझीच आज्ञा जन
तुझियावर हें हृदय चालवी हुकमत येथुन पण
शौर्य–वीर्य–तेजाची तुझिया खाण उफळते इथें
खड्ग तुझें पण तुला घावया कोण बरें लागतें ?
(२) हजार कोसांवरचा शत्रू चळचळ कांपे तुला
परंतु माझा क्षुद्र शब्दही कसा न तूं मोडिला ?
तुझा रोख पाहून हालते लाख फौज बेडरी
परंतु कल तूं माझा हेरुनि येशी अंत:पुरीं
नोक झोंक हा सांग कशास्तव; ठाउक पुरता मला
कां पण हे लडिवाळ चालती सांगुच कां ते तुला ?
नांवगांव पालटलें माझें कमला म्हणती मला
प्रतापगडच्या मैनेचा हा—अर्धांगीचा लळा.

प्रतापगड गड अवघड आणिक अभेद्य म्हणती जन
तटबंदी उध्वस्त कराया समर्थ पौरुष पण
परंतु बुरुजाआड लपेली आंत वसे स्वामिनी
जिंकिन म्हणतों तिला फेकुनी पाश असा येथुनी
थेराची ही लेक लाडकी कमळा म्हणती हिला
तसू तसू हृदयास लाविते वेड, करी मज खुळा
घरीं तुझ्या येतां मज पडते भुरळ तुला पाहुनी
मला काय ठाऊक असा मी जाइन नादावुनी
(३) उगाच मी वर दौडत असतों सहज वेधितों तुला
न कळत तूं विंधिलें लागला परस्परांना लळा
लढवय्यांची जात आमुची अम्ही रंगतों रणीं
परंतु सांठे सृष्टी माझी अतां तुझ्या लोचनीं
गवाक्षांत वाटली उभी मज ओळखिची आकृती
म्हणुन फेकिली घोडी हिकडे, निराश करिसी किती ?
जग सगळें हासतें मला, मज ठाउक माझ्या कळा
जिंकिन म्हटलें तुला परंतू तूंच जिंकिलें मला.

घोर युद्ध संपलें जाहलो पुरापुरा मोकळा
विजयध्वज फडफडे, फडफडो खुशाल तो आपुला
सैनिक माझे शूर म्हणुन हा आज उगवला दिन
जुन्या नव्या आठवणी देती ओझरतें दर्शन
आणि कसेंसें होय परंतू मी तर गोदातटीं
उन्हाळ्यांत अंगास फासुनी बसलों वर वर उटी
शांत शांत गोदातट, झाडी तीरावर गोजिरी
(४) प्रसन्न वातावरण येथलें, मजला दाहक परी
निजले सैनिक एकामागुन एक कसे झटदिशीं
मीच एकला बसें चाळवित तूं विणलेली उशी
चित्र तुझें सारखें नाचतें माझ्या डोळ्यांपुढें
सुचे न कांहीं मनास माझ्या तुझ्यावांचुनी गडे
सरेल का ही रात्र आजची सरेल का मग दिन
सरेल का रस्त्यांची लांबण अहोरात्र दौडुन
दौडत माझा जीव सारखा, थकवा त्याचा तुला
तुझिया हृदयामधले ठोके ऐकूं येती मला.

# आपलें निशाण

बघ निशाण वर हें फडफडतें
दे अंतःस्फूर्तीला भरतें.

तुज उत्तेजन द्याया वीरा
रात्रंदिन करितसे पहारा
आपुलकीला पुरा आसरा
नंदनवन उभवूं येथें.

देश आपुला वैभवशाली
दीनांचा गरिबांचा वाली
भविष्य उज्ज्वल लिहिलें भालीं
चोहिंकडे यश दुमदुमतें.

ह्यांत मिसळलें रक्त आपुलें
म्हणुन तया भगवेपण आलें
अभिमानाचे द्योतक पहिले
लढवय्ये आपण जेते.

हिंदभूमि हें पवित्र दैवत
अहोरात्र राहूं या जागृत
जयजयकार तुझा हे भारत !
वंदन तुज जनता करिते.

# चंद्रावरील डाग.

जरा रोखुनि तर पहा दुर्बिणींत
डाग चंद्रावर दिसति असंख्यात
किती असले तेजाळ गोल पाहीं
उणें तेथेंही नसे असें नाहीं.

स्वर्ग म्हणती सौख्यांत फार आहे
इंद्र तेथिल चिंतेंत परी राहे
कुठें कांहींतरि उणें असायाचें
म्हणुन आम्हीं का स्वस्थ वसायाचें ?

असे अपुला हा देश किती छान
तरी आपण आहोंत कळाहीन
विपुल पिकवी आपुली धरामाई
तरी गरिबांना खावयास नाहीं.

डाग ऐसे आहेत इथें फार
अंत्यजांना तरि लोटितोंच दूर
डाग मोठा हा कसा धुवायाचा ?
कधीं होइल उद्धार बापुड्यांचा ?

पुन्हां जोडा दुर्बीण पहायास
डाग अपुला मोठाच असे खास
जरी चंद्रावर डाग—लाज 'त्यास'
डाग अपुले हे—लाज ही कुणास ?

# स्वर्गाहुनी सुंदर

व्यापाला विटुनी म्हणे मन--गड्या, जा दूर कोठेंतरी,
    कांहीं वेळ--म्हणून ह्या गिरिवरी येऊनियां बैसलों
    दृष्टीच्या पुढती उदात्त सगळें पाहूनियां रंगलों
कीं उत्साह सदैव वास अपुला मूर्तस्वरूपें करी.

ह्या येथील वनांमधून दिसतें जीवंत जें जीवन
त्याचा अंशहि पाहण्या न मिळतो आम्हां हवेल्यांतुन
स्वातंत्र्यप्रिय येथला खळखळा वाहे झरा मोकळा
त्यायोगें पण पारतंत्र्य स्मरुनी दाटून येतो गळा.

स्वातंत्र्यप्रिय ही धरा जरि अम्हां आहे प्रभूनें दिली
    आम्हीं घालुन कुंपणें बसविलीं बंदिस्थ ठाणीं पण
घोका रोज धडे, शिका हरघडी तीं पुस्तकें फाटलीं
    चिंता एकच ह्या जगास---दुसरी पृथ्वी कशी निर्मिन.

माझ्या दृष्टिपुढें निसर्ग फुलला, वाचीन मी हा जर
हें आयुष्य सुरेख होइल किती स्वर्गाहुनी सुंदर.

# हृदय मिळे हृदया न जरी

हें हृदय मिळे हृदया न जरी
जीवन हो जड शिळेपरी.

रे सोंगाड्या मना ! भुलविसी
जग साधें नादांत झुलविसी
काय खेळ प्रीतिचा मांडिसी
घेशिल शापा फुकट शिरीं.

सर्वस्वाला होमुन आली—
प्रीत म्हणुन ही होय आंधळी
प्रीत जपे यज्ञाची बोली
उमजे त्याला तीच वरी.

उगिच न हो सैराट पिशाच्या !
बंद करीं रे ! अपुली वाचा
राशी तुच्छ हिऱ्यामोत्यांच्या
मोल हिचें दुसरेंच परी.

तुफान होवो उसळो दरिया
बुडो नाव धांवो यम खाया
हृदय मिळे जर अपुल्या हृदया
काय पाहिजे तुला तरी ?

# कु. कुंदा रानडे

हटुन बैसली कुंदकळ्यांची ही नाजुक बाला
तुजवर कविता लिहावयाला कवि आला आला
बंद तुझ्या बागेचे फाटक हळू हळू उघडे
ये ये म्हणती मला सोनुलीं आंतिल फुलझाडें
चैत्र असो वैशाख असो वा कुठलाही महिना
गाइन तुजवर गाणें छेडुन अंतरिंची वीणा
म्हणेन फुलले गुलाब फुलली तुजभंवतीं धरणी
आंब्यावर मज दिसेल मैना गातांना गाणीं
आणि तुजकडे येइल धांवत रानांतुन ओढा
बाळपाखरा ! निसर्ग घेतो तुम्हांकडे ओढा
आम्ही कृत्रिम, सृष्टीपासुन दूर दूर पळतों
सौख्यासाठीं उगाच दुसरीकडे भुके बघतों
म्हणुन आजला तुझ्याकडे ये मन आकर्षून
निसर्ग फुलतो तुझिया दारीं अगदीं लवथवुन
कुंदकळ्यांची बाला साधी नांव तुझें कुंदा
तुझें गोजिरें शैशव करितें मज पुरता बंदा
सहजच आले मनांत गावें तुजवरती गाणें
म्हणुन आजला घडे प्रभातीं तुझ्या घरीं येणें.

# कु. विजया कर्वे

कोण येत हा रुंजी घालित हिकडे माझ्याकडे
बाळरूप परमेश घेवुनी ये बोलत बोबडें
लाख नव्या कल्पना तरंगत येती जाती पुढें
लाख शब्द हिजसाठीं दिसती केविलवाणे खडे
परंतु माझें चित्त न देई लक्षच तिकडे मुळीं
शब्दांचा शिणगार न घेई हातांतिल कुंचली
असेल ठाउक तुम्हास—हिजला 'विजया' म्हणती जन
परंतु तुम्ही हांक मारितां बघेल फण फारुन
नोक झोंक ठसक्यांत खुलवितो जरतारी परकर
मृदुल रेशमी हात गुंतवी केसांची भुरभुर
पडेल मोहच तुम्हां मोहरुन शैशव येइल पुन्हां
साफ जाल विसरून आपुल्या प्रौढपणींच्या व्रणा.
आणि म्हणुन रंगलें गुंगलें मन्मन वेडें पिसें
बाळपणींचा काळ लाडका पुनश्च उभवीतसे
जरी खेळ हा चालायाचा केवळ कांहीं क्षण
धुंदपणें अश्रूंस तोंवरी देतो लाथाडुन
म्हणुन गात गोजिऱ्या बिजीवर बाळकवन साजिरें
कळो ना कळो कुणास गाइल बिजीच माझी बरें.

## चढण

ही चढण तरी सरणार कधीं
उतरणही नव्हती साधी.

कुठें चाललों न कळे अजुनी
कुठवर आलों न ये समजुनी
कीं मागें जातोंच चुकोनी
कळो मला इतुकेंच अधीं.

उलटें सुलटें वाहत वारें
डोंगरही वाटतो थरारे
उरीं भरे भीतिनें कांपरें
नव्या नव्या जडति उपाधी.

रे वाटाड्या ! पाहुं तुज कोठें ?
तुजवांचुन मी जाऊं कोठें !
जीवनगंगा वाटे आटे
गारठलों पुरता अगदीं.

पांगुळलीं रे ! गात्रें सगळी
कशी तरी तीं इथवर आलीं
गळतिल नकळत आतां खालीं
गाती ती तिकडिल नांदी.

# गांधीजी

जग वंदी त्यासच पुन्हां पुन्हां
हें घडत कसें न कळे कवणा !

तो नहि राजा, राजकुमारहि
नहि कोणी श्रीमंत धनाढ्यहि
न कोणि विख्यात तो कवीही
नहि असल्या कांहींच खुणा.

म्हणे जगाला—' ऊठ '—उठे जग
म्हणे जगाला—' डोळ्यांनीं बघ '
जग डोळे विस्फरुनि बघे मग
चहूंकडे करुणा करुणा.

जन देई ह्यातें सिंहासन
झुगारून हा देत विलक्षण
हृदयिं जगाच्या विराजला पण
अद्भुत ही सगळी घटना.

धूळ जगाची लुटिली ह्यानें
निसर्ग सुंदर उभवि उपवनें
शांतीचें साम्राज्य निर्मिणें
हा एकच ह्याचा बाणा.

# बाहुलीचें लगीन

चिंता मजला ही, तुझें तर लगिन जमत नाहीं.

पिच् पिच् अगदीं त्याचे डोळे
मान मोडकी लटलट हाले
केस कशाचे—गवत वाळलें
नको ग तो बाई, तुझें पण लगिन जमत नाहीं.

माझी नवरी किती चांगली
जशी हिरकणी दागिन्यांतली
पोर परंतू उभी वाळली
झोंप न हिज येई, तुझें पण लगिन जमत नाहीं.

तो ‘ तांब्याचा माधव ’ बघतें
जरा आंधळा, मला चालतें
स्थळ थाटाचें कोठें मिळतें ?
कां पण रुसली ही, तुझें तर लगिन जमत नाहीं.

नकोच तो तर, अडल्या वेळीं
नवरा होइन मीच आपुली
ही घे आतां साडी चोळी
खुदकन् हंसली ही, तुझें पण लगिन जमत नाहीं.

# निशाणासाठीं

बघे मागें मग सारखा वळून
बाळ, डोळे भरुनिया फिरफिरून
आणि जेव्हां जाहलें दिसेनासें
काय त्यातें वाटलें, वदूं कैसें ?

जसें आईपासून मूल न्यावें
हृदय तीचें त्यामुळें पिळवटावें
काय उपमा दुःखास अशा द्यावी ?
कल्पनेनें कळल्यास करुनि घ्यावी.

स्वदेशाचें तें परम प्रिय निशाण
दूर होतां; आलेंच खळबळून
देह कोणीं ओढिला पाशबद्ध
प्राण परि तो तेथेंच प्रेमबद्ध !

रात्र किरकिरते आंत त्या मनांत
दिसे जनता जरि चूर उत्सवांत !
मार्ग कष्टाचा–हाल–अपेष्टांचा
गमे त्याला मोकळा उन्नतीचा.

जरी त्याचें कोंवळें हृदय होतें
तरी वज्राहुनि कठिणची अतां तें
टिपें त्याचीं फुलवितिल बाग जेव्हां
विस्मयें जग होईल थक्क तेव्हां.

# ये हृदया माझ्या !

हे हृदया माझ्या ! बैस जेथल्या तेथें
रे नको करूं आक्रोश उलट जग हसतें
जरि कुणी लाविली आग तुझ्या अंगाला
ती समज असे रोजचीच मानवलीला.

लागलें जगाच्यामागें रोजच रडणें
पाहिजे कशाला त्यांत तुझें रडगाणें ?
चल ठेव आंतल्या आंत दाबुनी आग
बघ विश्वकमल उमलेंल होइं तू दंग.

चैतन्य चहुंकडे भरे असें कर कांहीं
कां उगिच मला शिणविसी आंतल्या भाई
हें नसे जरी साधणें तुझ्या वृत्तीला
तर तुला इशारा देत आज शेवटला.

उन्मळुन पाड हें झाड तुझ्या खाईंत
कर भस्म तयाचें आणि हो कसा शांत.

# माझें फूल

हें फूल जाउं द्या माझें रानीं गळून
कुणि उचलुं नका त्या नका बघूं ही वळून.

ही वेल लाविली येथें रानींवनीं
ह्या डोळ्यांमधले अश्रु तिला सिंचुनी
कीं वाढो येथें दूर जगापासुनी
पण जग त्यावरची दृष्टि न देई ढळून.

प्रतिनिधी प्रभूचे येथें चोहोंकडे
सहवास तयांचा मज सहजीं आवडे
मी हृदय उघडितों केवळ त्यांच्यापुढें
ऐकून कहाणी जाती तेही द्रवून.

दिनरात्र पहारा माझा येथें असे
ही वेल येवढी जगवायाचें पिसें
हें वेड न—आशा त्याची मजला असे
तर दूर व्हा कसे दृष्टिपथांतुन इथून.

हें करपुन जाइल तुमच्या श्वासामुळें
कां उगाच छळतां आपुलकीच्या बळें
हे हात न—तुमचे पाजविलेले विळे
या शस्त्र चालवा मजवर, न्या मग खुडून.

# कु. सुचरिता बापट

मूर्तिमंत ऐश्वर्य भूवरीं ज्यास तुळा नाहीं
बाळगुणी साश्चर्य सोनुल्या जगाकडे पाही
इवल्याशा नेत्रांत सांठवुन घेत नवी धरणी
गांभीर्याची छटा मनोहर सहज पहा आणी
हांसत खिदळत बाळ फेंकितां चहूंकडे दृष्टी
ताप आणि संताप विसरतें जग दुःखीकष्टी
आनंदाचा पाउस पडतो आहे या ठायीं
ऊन त्यांत खेळतें साधण्या अपूर्व नवलाई
प्राजक्ताच्या गोड फुलांनीं अंगण दरवळलें
सान बाळ ओटीवर अपुल्या आईशीं खेळे
कौतुक नेत्रांमध्यें--उभ्यानें कोण असे जवळी
हे बापाचें हृदय न्याहळी सोनुकली बाळी
पिता तुझा गुणवान् रसिकवर आणि बुद्धिमान
शील जयानें गणिलें पृथ्वीहून मौल्यवान्
उज्ज्वल व्हावें चरित तुझें या जगीं सान बाळे
म्हणुन ठेविलें नांव तुझेंही उचितच वेल्हाळे !
गात तुझ्या कानाशीं मी हें बाळगान माझें
अशीच हांसत राही सगळे बाळाला साजे.

# स्वैर वावडी

हृद्‌याची उंच उडत स्वैर वावडी
तळमळते नाशवंत खालती कुडी.

उमटतात पायांचे बोलके ठसे
त्यामुळेंच होत असे आपुलें हंसें
व्यापकविश्वास हेतु ठाउका नसे
नेत्रांची पलटण पण जग करी खडी.

आशेचे तरल पंख लावुनी कुणी
तारकांत मौजेनें जात मिसळुनी
भिन्नभाव चित्र उभवि आपुल्या मनीं
विसरावें बंधन हा हेतु हरघडी.

सूंसूंसूं करित बाण येत खालुनी
आश्चर्यच कीं न ऊर जात भेदुनी
मोल तुझें स्वातंत्र्या ! घे कसें झणीं
भिजवीं रक्तांत म्हणुन चिवट चामडी.

घरघर ही विश्वाची सतत चालली
ध्येयपूर्ति साधाया देतसे बळी
अर्पाया बहर नटे उमलती कळी.
सर्वस्वासह यज्ञीं घेतसे उडी.

# माझ्या जगा !

कुठवरी तुझे मी चरण धरूं
ह्यांतच किंवा सांग मरूं.
नव्या जगावर नवी चढाई
कराति कराविती भंवतीं भाई
न कल्पनेंतहि दिसे ढिलाई
असली दंगल दिसे सुरूं.
ऐश्वर्यानें महाल फुलले
हीनपदीं तें सुवर्ण लोळे
रुधिरानें दिनरात न्हाणले
जो तो ह्यांतच बघे तरूं.
अंगिं न उरली क्रूर धिटाई
मिळवाया येथील भलाई
शस्त्रावांचुन असा शिपाई
जगहि अशाला बघे चिरूं.
काप जगा तर—खरतर नखरीं
चल होऊं दे आज तें तरी
तृषार्त तूं—माझीहि तयारी
दोघेही मागें न सरूं.
फूल चुरडुनी जर तुज शांती
वायूलाही गंधप्राप्ती
मीहि बघें अजमावूं शक्ती
घडा घालितों वळें भरूं.

# घरीं ये नवीनच हा पाहुणा

घरीं ये नविनच हा पाहुणा
पटली ओळख, पटल्या अंतरिं खुणा.

ये म्हटलें तरि नहीं यायचा
जा म्हटलें तरि नहीं जायचा
विचित्र ऐसा स्वभाव याचा
असे हा स्नेही माझा जुना.

सत्काराची ह्यास न गोडी
भीडभाडही ह्यास वावडी
हुषार हा उलगडतो कोडीं
अजुन जीं सुटलीं नाहीं कुणा.

जगांतला ह्या, घ्या कोणीही
सगळ्यांचा हा जिवलग स्नेही
कृत्रिमता ह्या ठाउक नाहीं
कुणीही यावर कांहीं म्हणा.

हा येतां मज होय कसेंसें
याच्यासंगें कीं जावेंसें
जडे जिवा याचेंच मग पिसें
अशाची तुम्हां काय कल्पना.

आणि पहा हा—निघे, निघालों—
मीहि कळेना कुठें चाललों
कळलें पण याचाच जाहलों
लोपला भाव आणि भावना.

# ऊठ अतां हे हृदया !

मजभंवतिं पसरलें दाट धुकें
रविकिरण प्रखर पण रिघुं न शके.
बघतों आहे फाडुन डोळे
चर्मचक्षुंना तरि न न्याहळे
जुनें जगच पण दिसे निराळें
कां यांत कांहिं माझेंच चुके ?
म्हटले ज्यांना माझे म्हणुनी
धुक्यांत गेले ते मावळुनी
वाहत मी पाठीवर गोणी
हें ओझेंही नाहीं हलकें.
जंगल किंवा नगर सभोतीं
स्वदेश किंवा ही परवसती
निश्चित मज कांहीं न संप्रती
हें जगत् मला मी जगा मुकें.
ऊठ अतां हे हृदया खवळुन
देऊं या जग पुन्हां चेतवुन
शिरजोरावर हाणोनी घण
जो बलवत्तर तो मात्र टिके.
नांव नको मग गांगरण्याचें
हळहळण्याचें तळमळण्याचें
तेजावांचुन धडपडण्याचें
चल फोड वाट तर दे दणके.

ठिबकतो फळांतुन मधु खालीं
कुणि न तुझ्यावांचुन वाली.

बुलबुल गाई आम्रतरूवर
जागोजागीं गुलाब सुंदर
वसंतवैभव हें चेतोहर
डुले त्यांतची रम्य कळी.

उमरखयामा ! तुजवांचुन; रे !
सर्व सुणें हें नंदनवन रे !
अंतरसृष्टी होइ म्लान रे !
प्रिया तुझी रुसुनी बसली.

ऊठ पुन्हां तूं, उठेल गाणें
गातिल सगळे एकसुरानें
एकदिलानें एकमुखानें
दवडुं नको ही मौज मुळीं.

त्या मातींतुन गंध ये वरी
येइल त्यांतुन तुझीच स्वारी
असें वाटतें अजुनही परी
टवटवीत ही मधुवल्ली.

सुकोत द्राक्षें, जावो गळुनी
फुलें जाउं द्या मातिस मिळुनी
श्वास तुझा पण भासे अजुनी
ह्यांत खरी जादू भरली.

तुझिया गानीं गेलों झिंगुन
धुंद धुंद मी धुंद तुझा स्वन
जागविण्यातें तूं ये उफळुन
पुनरपि अपुलें यश उजळीं.

## नकळत तूं

नकळत तूं सोबतीण होउन मज घेरिलें.

विश्व हें किती अफाट
काय हा लहान हाट ?
अचुक कसें मजसि त्यांत
तूंहि कुशल, हेरिलें.

जे चुकवूं बघति तुजसि
त्यांच्या तूं पाठीशीं
कोट नेत्र तुजपाशीं
म्हणुन शक्य जाहलें.

शिखरावर जा पळून
किंवा सृष्टी फोडुन
खोल खोल जा दडून
तरिहि तूं न सोडिलें.

मग कशास तुज चुकवूं ?
तोंड कशाला दडवूं ?
डिवचुन कां उगिच खिजवुं ?
तुजलागीं प्रेमले.

तर तर, चिंते ! मजला
आलिंगूं दे तुजला
सौख्य तुला सौख्य मला
धन्य जिणें जाहलें.

# अर्थहीन गाशी तूं

अर्थहीन गाशी तूं कांहिंही मुली !
होसीही तल्लिन किति सहज आपुली.

न कळे मज उघड कांहिं
खचित आणि तुजलाही
पण आपण दोघांहीं
विस्मृतिची मौज चाखिली.

चाल नसे ताल नसे
त्यावांचुन अडत नसे
जमलें पण सर्व कसें
मौज मना हीच वाटली.

दाविलीस मज सकाळ
जरि अगदीं कांहिं काळ
अनुभविला रम्यकाळ
शैशवीं उडीच घेतली.

घुमव बोबडेच बोल
त्यावांचुन जगत फोल
अर्थ त्यांत मजसि खोल
जीवन-कलि फुलत राहिली.

लाख जिभा चालवून
जें न उकलि पंडितगण
तें येथें ये समजुन
ज्यास बालबोलि उमगली.

# बघ वृक्षापोटीं

बघ वृक्षापोटीं अद्भुत बीं
वीज दडे घुमटांत नभीं.

कठिण खडक पाठीवर धरितो
झरा आंत झुळझुळत वाहतो
प्रयत्नवादी एक बघे तो
मळा फुलवितो मग कुणबी.

आणि हिऱ्याची कथा विलक्षण
दडुन बसे कोळशांत हें धन
असंख्य घेई शिरावरी घण
मग मिरवित तो तेजस्वी.

कोळी घेई ठाव सागरीं
येई मग मोतीं बाहेरी
पृथ्वी धरिते त्याजला शिरीं
सृष्टी सगळी त्यास नवी.

तुझ्याहि मनुजा ! असेंच कांहीं
दडुनी हृदयामध्यें राही
फिकें ज्यापुढें सूर्यतेज ही
शक्ति अशी आंत रे ! उभी.

# उदासीन.

खुळा त्याला म्हणतसे गांव सारा
कुठेंही जा गांवांत हें विचारा
हेंच उत्तर मिळणार तुम्हां खास
जगत् त्याला, तो जगाला उदास.

पिके गांवाजवळील आंबराई
तिथें जाणेंही त्यास रुचत नाहीं
भजन चाले जवळील देउळांत
तरी त्याचें मन रमेनाहि तेथ.

'थोर झाली रे पोर '–गांव बोले
–लगिन तीचें कर दिवस सरत आले–
तरी त्याचें मन वेध घेत नाहीं
अशी त्याला दुःस्थिती प्राप्त होई.

पावसाळ्यामागून ये हिंवाळा
आणि आतां तर रखरखे उन्हाळा
ऋतू बदले–चहुंकडे फरक होई
हाच एकाकी ह्यांत फरक नाहीं.

रात्र पडल्यावर बसे अंगणांत
नभीं तारा चमकती–त्या पहात
जगाविरहित हा असे उदासीन
तिचे मागुन–त्याजला जगत् शून्य.

# मकर संक्रांत

—आणि आली संक्रांत पुन्हां आज
लेवुनीयां भरजरी नवे साज
तीळ भेटे जावून साखरेला
नवेपण ये त्यामुळें त्या जिवाला.

वर्षभर तो उघडाच तीळ होता
देह झांकुन घे साखरेंत आतां
गोड येई त्यामुळें त्यास रूप
मजा करिसी साखरे ! तूंहि खूप.

—आणि आम्हीही वंश मानवाचें
रूप धरितों प्रत्यहीं राक्षसाचें
बघा आजच आम्हांस न्याहळून
सोंग दुसरें घेतलें रंगवून.

करीं अमुच्या हा बघा तीळगूळ
मुखीं अमुच्या हा बघा तीळगूळ
कृती वृत्ती आजच्या नाटकाची
असे बेमालुमः बघा ह्या नटाची.

' उद्यां ' येतां होईल भूत जागें
आज जबरीनें आंत झोंप जें घे
म्हणुन मजला संक्रांत खिन्न खिन्न
' उद्यां ' येतां होईनही प्रसन्न.

# संध्याकाळ

रवी गेला केव्हांच पश्चिमेला
रंग सोन्याचा तोहि मलिन झाला
अतां लवकर काळोख पसरणार
आणि गरिबांचे कष्ट संपणार !

पलीकडल्या डोंगरांतून गाई
चरुनि मागें लागल्या परतण्याही
गुराख्यांचीं धाकुटीं व्रात्य बाळें
गुरांमागें चाललीं करित चाळे.

मळा अपुला खुरपून नांगरून
बैल हांकित परतला बागवान
घरीं त्याचीं बालकें अंगणांत
उभीं असतिल—असतील बघत वाट.

उभी उत्सुक असणार बघत वाट
धनिण त्याची गरिबींत भाग्यवंत
नसे तीचा कृत्रीम डामडौल
प्रेम सात्विक तेथेंच पण पहाल.

कष्ट दिनभर जरि करितसे उन्हांत
जरी चाले संसार गरिबींत
घरीं येतां—स्वर्ग तो तुच्छ त्यास
नेत्र भिडले मग उणिव नच सुखास.

# ज्यांना म्हणतों आपण अपुले

ज्यांना म्हणतों आपण अपुले–ते सगळे अपुले
खरें नको हें मानूं केव्हां शब्दजाल असलें
निकषावर लावून पाहती सावकार सोनें
उघडकीस ये त्याचमुळें मग कमअस्सल नाणें.

जन्म दिला तुज ज्यांनीं ते ते थोर मायबाप
कधीं नको तूं देऊं त्यांना कसलाही ताप
जन्मजात जे तुझे, तेच पण बळकट कर पंख
घरांत तुजला येइल इभ्रत मग मग निःशंक.

यानंतर जे क्षितिजावरती दिसती ते भाऊ
नकोस त्यांच्या वाटेला तूं चुकुन कधीं जाऊं
जर तुज व्हावी भलीभलाई दे त्यांना सगळें
कांहींही कर पण हें आधीं पाहिजेच शिकलें.

आणि हवेही आपुलकीला थोडेसे मित्र
जपून वापर सदासर्वदा हें मोहक शस्त्र
कांट्यावांचुन गुलाब ह्यांना नेहमींच व्हावा
ना तर जाइल उडून भुर्कन हा हळवा रांवा.

इतुकेंही करुनी न लाभली जर तुजला शांती
लाख कोस जा दूर येथुनी मग तुज ती प्राप्ती
आणि हेंच श्रेयस्कर : जेथें नाहीं काळीज
आग लाव त्या आपुलकीला दे सोडुन लाज.

खूणगांठ पण बांध एक कीं येइल तुज कामीं
एकच एकच निस्वार्थी ती प्यार मायभूमी
या देहाच्या सांगाड्यावर तिचाच अधिकार
तीच एकटी समर्थ, उचली शेवटचा भार.

* *

आपुलकीचें गाणें रचितां अश्रू टपटपले
कांता प्रेमळ तिच्याचसाठीं तेही अवतरले
अंगणांत जमतात पांखरें सकाळच्या प्रहरीं
एक पांखरूं अर्पि दुज्यांना या सरत्या लहरी.

# कोट हिऱ्यांचे तेज इथें

कोट हिऱ्यांचे तेज जिथें
लोपुन गेले- हें स्थळ तें.

स्वातंत्र्याच्या इतिहासाचें
पान इथें मिटलें शेवटचें
स्मरण आज होऊन तयाचें
हृदय आंतुनी पिळवटतें.

येथें लढले वीर मराठी
केवळ अपुल्या देशासाठीं
वेळ आज पण ये उफराटी
स्तंभ न दगडाचाहि तिथें.

भाग्यहीन हे माझ्या देशा !
कळाहीन हे माझ्या देशा !
बंदिवान तूं—तुझिया आशा,
कथितो वारा इथें इथें.

इथेंच पडले शूर गोखले
इथें मोडले ताठर भाले
पारतंत्र्य येथेंच जखडलें
स्वर्ग नरक दोन्ही येथें.

हवे असें ते घे दोहोंतुन
क्रोधें वदती ह्या भूंतिल कण
हळहळलें तळमळलें मग मन
मरणच वाटे अनुभवितें.

# परक्या देशांतील गृहस्था !

परक्या देशांतील गृहस्थाः शांतपणें तूं राज्य करीं
चंद्र सूर्य जोंवरी वरी

उगाच शंका नकोस घेऊं, वाच आमुचा इतिहास
पुन्हां तुला होइल हर्ष

शूर पटाइत अम्ही पूर्वींचे, असलों जरि आम्ही थोर
तरिही वाटुं नको घोर

पोटासाठीं धडपड सगळी, स्वार्थोपायीं मरूं मरूं
त्याकरितां कांहींहि करूं

बडबड तडफड करोत कोणी, बघूं नको अगदीं तिकडे
कर तिकडे आम्हांस खडे

जरी येत तो देवहि खालीं, त्या मूर्खांच्या साह्याला
लावूं माघारा त्याला

शतकांपूर्वीं पणजे गेले, सांगुन पढवुन आम्हांला
जागूं त्यांच्या शब्दाला

हमीच याची तुला हवी तर, बघ येउन माझ्याच घरीं
दिसेल तुज फितुरी फितुरी

परक्या देशांतील गृहस्था ! शांतपणें तूं राज्य करीं
चंद्र सूर्य जोंवरी वरी.

# अस्वलास वेसण खाशी

अस्वलास वेसण खाशी
घालून फिरे दरवेशी.
जंगलांत ज्याचें जगणें
मन माने तैसें फिरणें
जो क्रूर वन्य जातीनें
तो लोळण घे दाराशीं.
बस खालीं म्हणतां बसतो
धनि म्हणे ' ऊठ ' मग उठतो
नाचून आणि दाखवितो
वेसणींत जादू ऐशी.
रस्त्यांत तमाशा त्याचा
क्षण इतरां तो मौजेचा
धंदा हा दरवेशाचा
तांब्याच्या जमती राशी.
दास्याचे त्याच्या असलें
खूप हें विडंबन चाले
जे अवतींभंवतीं जमले
आनंदच त्यांत तयांसी.
तो पशूहि न धरी खंत
विसरला आपुली जात
तन्मय हो त्यांतच चित्त
हें जनावरच गुलहौशी.

# जगांत जर का असेल कांहीं

जगांत जर का असेल कांहीं जें न करावें कुणी
जें केल्यानें माणुसकीला नर मुकतो तत्क्षणीं
करूं नको तूं तसलें पातक कांहीं झालें तरी
भर मातीची ढिकळें उदरीं प्राण चालला जरी.

पाणवठ्यावर जाउन किंवा तुडुंब पाणी भरीं
परंतु माझ्या लाला: ते ते कर्म न केव्हां करीं
प्राण एकदां जाइल जावो काय तयाची क्षिती
कितीक मेले आजवरी अन् मरतिल अजुनी किती.

तशांतही जर अगदि बेतली गोष्टच प्राणावर
आणि तुलाही नच राहवलें—तर हें आधीं कर—
मुळामुठेवर पूल बांधितो इंग्रज हौशी गडी
खुशाल जाउन उंचावरुनी खालीं टाकीं उडी.

परंतु मरणाहून मरण जें होणें देणेंकरी
चुकेल ते ते शपथ तुला ही गोष्ट न केव्हां करीं.

# पढवुं तरी तुजसि किती

पढवुं तरी तुजसि किती तेंच तेंच पोपटा !

कठिण जसें तुजसि पठण
त्याहुनिही मजसि कथन
आणि हेंच तूं जाणुन
मुग्ध बससि चावटा.

घरिं न आज कोणीही
तोंच शिकुन तूं घेई
हौसेनें शिकविं मीहि
उघड चोंच वात्रटा.

ते येतां बाहेरुन
बोलुन दाखिव आंतुन
नांव 'तयांचें' घेउन
ऐकलेंस ना खटा.

थकलें मी फार बाइ
हा न मुळीं बोलतही
शरमिंदी मीच होई
गोड नांव घोकतां.

फडफड फड पंख करिसि
भीति मला दाखविसी
लाज न रतिभर तुजसी
चिडविण्यास उद्धटा.

## द्वाड मनी

गुणी आणि अवगुणी—अशी ही द्वाड आमुची मनी.

जशी काय ही बाई कोणी
आली बर्फाच्या देशांतुनि
अंगाला कापूस डकवुनी
मऊ रेशमाहुनी——अशी ही द्वाड आमुची मनी.

डोळे इवलाले लुकलुकती
अधिकच घारेपणांत खुलती
नजर असे पण चोरटी किती
सदा दंग अंगणीं——अशी ही द्वाड आमुची मनी.

दंग अशी खेळांत तरीपण
गर्का देइल (तोहि एक क्षण)
आणि काय—ये ध्यानीं मागुन
प्यालि दूध चोरुनी—अशी ही द्वाड आमुची मनी.

मनी मावशी माझी मांजरी
तुम्हाहून लाडकी कितितरी
बिलगूं का—पण पळाली दुरी
मला ओरबाडुनी——अशी ही द्वाड आमुची मनी.

अशी द्वाड तर, गट्टि सोडुं का ?
किंवा थोडें दूध तोडुं का ?
वाळुन ही पण जाइल अक्का.
नका मारुं हिज कुणी—अशी ही द्वाड आमुची मनी.

# देवापाशीं गरिबाचें मागणें

देव ओलांडुनि धरा घरीं गेला
मीहि अपुल्या पण चाललों घराला
पंख आशेचे खेचिती अम्हांला
गरीबीला तें जडच ओढण्याला.

सर्व दिनभर कष्टांत मरायासी
देवराया तें देतसे अम्हांसी
आज पण ह्या पंखांत जीव नाहीं
धरेवरती गळणार खचित तेही.

असें झालें तर—धनिक करिल काय ?
अम्हांवांचुनि तो करिल हाय हाय
कोण त्याचे करणार कष्ट बोला,
जगव आम्हांला म्हणुनि रे दयाळा.

मागणें गरिबाचें हें
ऐकिलें खास तेवढें !
घडामोडी किती होती
ठाम त्यामाजि एवढें !

# भ्रमरा ! भ्रमण तुझे अनिवार

भ्रमरा ! भ्रमण तुझें अनिवार
मीहि वणवणें अपरंपार.

द्राक्षांच्या वेलींतुन केव्हां
आम्रमंजरी-मधुनी केव्हां
फुलांफुलांतुन गुंगशि केव्हां
चाखत मधुसंभार.

वेलिफुलें दृष्टीस पडावीं
घटना ही विधिचीच असावी
त्यांत तुझी वृत्तीहि खुलावी
गोड असा संसार.

तुजसी ठावें त्यांना लुटणें
मधुलोलुप आहे तव गाणें
त्यांतच जगणें त्यांतच मरणें
न कांहिं तुज दरकार.

तुझ्यासारखा मीहि वणवणें
दिनभर माझें चाले गाणें
नशिबीं पण रे ! वीख चाखणें
वाहुन दिनभर भार.

ह्याच विखांतुन परंतु वाहे
अमृत मधु जें दडुनी राहे
अमोल अनुभव, जे सगळे हे
इतरां जीवनसार.

करूं न कुरकुर म्हणुनी केव्हां
हातीं ऐसा जोंवर ठेवा
वणवणीमधें नको विसांवा
काळ न आहे फार.

—तर तर भ्रमरा ! तुझें चालुं दे
गान गोडवें आणिक साधें
तुझ्याबरोबर मज गुंगूं दे
असेंच वारंवार.

# आगरकर

निंदेचे शर तीक्ष्ण सोसुनि जनीं आणावया जागृती
सत्कर्मप्रतिपालनार्थ झटसी—ऐशी तुझी योग्यता !
रूढीचे दृढपाश जे खिळुनियां आम्हांमधें राहती
त्यांचें भस्म करावयास अपुली तूं चेतवीली चिता.

विश्वव्यापक तत्त्व जें ठसविलें तूं ह्या समाजामधें
त्याच्या आचरणांत नाहिं टिकले कित्येक खंदे सुधे
तूझा निश्चय मात्र निश्चल खरा, तूं संकटें सोसुनी
रानें तोडुनि मंगलप्रद नवी केली पुन्हां पेरणी.

तेव्हांचें जग हांसलें तुज अतां हांसें तयाचें पण
तूं तेव्हां झटलास, आजहि कुणी स्वार्थाप्रती होमुन—
नीतीचा पथ धीर देउनि करी तेजोबळें उज्ज्वल.
दृश्य स्मारक हें तुझें बघुनियां मी होय हर्षाकुल.

ऐसे थोर सुपुत्र, हेंच अमुचें देतें अम्हांला पुणें
आम्ही निंदुन त्यांस मात्र क्रमितों लाजीरवाणें जिणें.

# कल्पने !

कल्पने ! तुझा मोहक परिवार
जग मिंधें, तें त्यावर स्वार.

स्वर्ग तुजमुळें जवळ वाटतो
अम्हांमुळें जरि असे दूर तो
पंखावर तुझिया तो तरतो
सौख्य तयांतच त्यास अपार.

तुझ्यामुळें जग सुरळित चाले
शब्दब्रह्महि तगे तुजमुळें
तुझ्यामुळें आशेचे इमले
झुकावया नेहमीं तयार.

किंमतवाला ‘ काळ ’ मरे जरि
शोक न कोणी करित बसे परि
कारण तूं—हे त्रिभुवनलहरी
भविष्यही घे तव आधार.

ब्रह्मांडाला फिरविशि गरगर
शक्ति तुझ्यांत अशी बलवत्तर
अवलंबुन प्रभुजीहि तुझ्यावर
तूं देशिल तो घे आकार.

तूं जातां ही भिकार धरणी
बुडेल दुःखाच्या आभरणीं
लुप्तहि हो शब्दांची तरणी
चोहिंकडे मग हाहाकार.

घडावयाचें हें न कधीं पण.
उत्साहाचा हा चालू क्षण
विकल्पनेनें उगाच दवडुं न
करूं तुझा तर जयजयकार.

## हीं फुलें मुलें मज

हीं फुलें मुलें मज सहज कशीं मोहिती
जग तयांमुळें, अधिकची खुले, शैशविं रमते मती.

मी जमविं नेहमीं माझ्याभंवतीं मुलें
तो स्वर्गहि हेवा करीतसे हें कळे
हें सौख्य येथलें--तिकडे नच त्या मिळे
ही कृपा प्रभूची—नच तिजला परिमिती.

ही सकाळ उगवे फुलांमुलांच्यामुळें
रखरखे ऊन तें केवळ आम्हामुळें
ये रात्र मागुती टाकित जड पाउलें
कीं मिळो विसांवा चिमण्या जीवाप्रती.

व्यवहार जगाचे सलती कांट्यापरी
पण क्षिती तयांची मन नच केव्हां करी
लविली नजर त्या अखंड सौख्यावरी
साउल्या सुखाच्या इतर न मज ओढिती.

या फुलांमुलांनों ! नाचूं खेळूं गडे !
आनंद आपुल्यापुढें पहा बागडे
सृष्टीहि कौतुकुन येइल अपुल्याकडे
मग मजा लुटूं त्या वनराईभोंवतीं.

विसरतों वयाला येतां तुमच्यामधें
विसरतों जगाला येतां तुमच्यामधें
जादूच प्रभूजी तुमच्या हातांत दे
हें म्हणुनच तगलें दुष्टहि जग संप्रती.

# म्याक्स्वेनी

कोठें तुझा देश, मी दूर कोठें वसें ह्या महाराष्ट्र देशामधें
दोघे ' पराधीन ' हें एक नातें पुरेसें असे आज आम्हांमधें
माझ्या घरीं माय माझी उदासी तशी ती तुझीही असे आजला
चित्तीं अहोरात्र हें शल्य माझ्या, तसें तें सल्या जाळितेंही तुला.

आले हिमाद्री जरी संकटांचे, तरी टेकड्या त्या तुला वाटती
तूं सोशिलीं संकटें काळभेदी, तयांची नसे तूजलागीं क्षिती
दृष्टीपुढें तूझिया मायभूमी दिसे एकटी तीच ती देवता
ऐसा महात्मा जगांतून जातां मनीं काय होई नये सांगतां.

प्रेमें जिनें वाढवीलें जयाला जपोनी खपोनीच अंकावरी
नेतां तया वाघिणीच्यापरी ती पहा जाहली कावरीबावरी
खोऱ्यांदऱ्यांतून धुंडीत आहे तुला जन्मदात्री तुझी माउली
पाहोनि हें चित्र भारावलों मी मुक्यानें तुला अर्पितों अंजली.

# रसज्ञ संपादका !

ता. ...... नं. ......
ता. ..........

खरोखर, रसज्ञ संपादका !
प्रगतिचाच तूं तर सखा !

नवयूग तुवां निर्मिलें
काळास पुढें खेचिलें
कार्यास आणि लाविलें ॥ खरोखर० ॥

राजांच्या सिंहासनीं
शक्ति महा म्हणती जनीं
पण तुझ्यांत अधिकच गणीं ॥ खरोखर० ॥

धनवान्हि रत्नाकर
पण दुर्घट तें तळवर
पण उदार तूं तत्पर ॥ खरोखर० ॥

रवि प्रकाशतो भूवरी
तो प्रकाश अपुरा परी
ज्ञानसूर्य रे तव करीं ॥ खरोखर० ॥

प्रगतिची तुला संगती
तिज तूंहि योग्य सारथी
तूं अमुचा सेनापती ॥ खरोखर० ॥

तर असेंच ने यापुढें
हें सैन्यहि मागें खडें
बघ निशाणही फडफडे ॥ खरोखर० ॥

# जित !

पिंजऱ्यांत क्रोधें गुरगुरतो
शेवटिं तो शिर आपटतो.

ज्याच्या आरोळ्यांनीं डोंगर
भयभीतीनें कांपति थरथर
तोच इथें हा मानी वनचर
बद्ध—त्यामुळें खवळे तो.

खोऱ्यांतिल घनदाट वनांतुन
निर्भय पहुडावें जाळयांतुन
आजुबाजुला उंच उंच तृण
वैभव हें तो आठवितो.

शुभ्रस्फटिकमय दऱ्यांतिल झरा
उड्या घेत वाहतो झरारा
प्रदेश ऐसा त्याचा सारा
दूर दूर तरि त्या दिसतो.

कड्यावरोनी ताठरतेनें
जग अवगाणिलें पराक्रमानें
अपमानाचें यापुढें जिणें
काळ त्यास डिवचूं बघतो.

पशुसंग्रहिं त्या आतां वाडा
फेंकि कुणी मांसाचा तुकडा
रागांतहि पण गिळी तेवढा
कदर कोण त्याची करितो ?

खुशाल पंजे घे आपटुनी
किंवा घे गज उरिं खुपसोनी
पारतंत्र्य तुजलागिं अवगणी
जित तूं आम्हीं तुज हसतों.

# खडकीची लढाई

अतां यापुढें अखंड रात
चोहिंकडुन सगळाच घात.

चपळ घोडदळ मागें हटलें
शूर पायदळ पुढें न हाले
अकस्मात लटपटले भाले
गळ्यास लागे कपटी तात.

फितुरी ठाउक कधींच नव्हती
तख्तामध्यें अजिंक्य शक्ती
घरभेद्यांनीं परी शेवटीं
वीष ओतिलें जलाशयांत.

पुण्यास खेटुन मुळा वाहते
पलीकडे खडकीचीं शेतें
उगवे फितुरीचें बीं तेथें
निमकहरामांचें जोमांत.

लढे एकटा थोर गोखला
पिंटो परदेशींहि जागला
इमान एकच ठाउँ ज्याला
उडी घेत तो रणकुंडांत.

खडकी पाहे अशी लढाई
अशीच दे इतिहासहि ग्वाही
बुडे मराठी ताठरशाही
ओठ आपुले अपुले दांत.

खिन्न न हो पण माझें भारत
असे रात्र तोंवरि हें चालत
येइल न कधीं मोरो दीक्षित
माराया हृदयावर लाथ.

पडे रायगड ह्या खडकीवर
बुडे पलिकडे हताश भास्कर
शेवटचा हा प्रसंग खडतर
मर्दुमकीचा अंत जयांत.

# हे तृष्णे

राज्य तुझें अनिरुद्ध अफाट
हे तृष्णे ! म्हणुनिच घातपात.

पायदळीं सोन्याच्या खाणी
संपलि नच पण हळहळ अजुनी
वृत्ती चंचल तुझी क्षणोक्षणिं
रुधिरीं माखुन बैसे हात.

सदैव आहे जीभ कोरडी
समोर वाहतसे नदि दुथडीं
अक्षय जरि घे जीव त्यांत दडि
चालविशी तरिही आकांत.

कोट कोसही उणे भासती
वसाहतीस्तव तुझ्या—हे सती !
चुरडिशि म्हणुनिच काय धरित्री
गरिब अशी एका निमिषांत.

तर तर—धिंगाणा चालूं दे
मनासारिखें तुझ्या होउं दे
कणखर होतिल त्यांतच सांधे
गरिबां जीवन काळोखांत.

देवांनाही तुवां नाडिलें
ऋषी तपस्वीही नच सुटले
कितिक संत साधू गडबडले
प्रबल शक्ति तूं अशी जगांत.

तुझ्यावांचुनी जग पाचोळा
कवडीही नच किंमत त्याला
प्रिय म्हणुनी तूं असशि अम्हांला
ध्रुपद तुझें घोळुंहि स्वप्नांत.

## सयाजीराव महाराज—

तूं नृपति, न सिंहासनामुळें
अधिराज्य तुझें हृदयांवरलें.
तोफांचें कितिकांना रक्षण
तर्वारी कितिकांचें चिंतन
त्याचमुळें त्यांचें स्थिर आसन
ढोंग सोंग आणिती बळें.
सोनें मोतीं आणि हिऱ्यांचें
एकत्रित कोठार धनाचें
नटतें लेवुन शरीर यांचें
किंमत ह्यांना त्याचमुळें.
कितीक ऐशीं थोर बाहुलीं
ह्या जगतावर आलीं गेलीं
टिळाच त्यांच्या केवळ भालीं
तगरीचीं निर्गंध फुलें.
परंतु—तुझियामुळें नृपवरा !
थोर वाटतो इतर पसारा
तूं भूषण त्यांनाच उदारा !
तुझ्यामुळें तर तेज खुलें.
म्हणुन तुझें यश बघ दुमदुमतें
भविष्य हें सांगेल जगातें
नको भाट कवि कथावयातें
जग उंचावे तुझ्यामुळें.

# प्रभु सृष्टीचा रंगारी

प्रभु सृष्टीचा रंगारी, तऱ्हेतऱ्हेनें रंग भरी.

आकाशींच्या घुमटावरती
दृष्टी फेकुन पहा प्रभातीं
मजेमजेचे रंग तरंगति
खुलुन शोभवी परोपरी.

आणि दूरवर जे हे डोंगर
पहा—कितितरी दिसति मनोहर
बहिरंगानें झांके अंतर
कुंचलि तेथें हाच धरी.

आजुबाजुचीं झाडें वेली
पांघरति किती शालि दुशाली
हिरवी पिवळी राइ बहरली
निर्मि विविधता हाच परी.

जग हें फुलतें रम्य फुलांनीं
अंधुक गोंडस मृदुरंगांनीं
छटा जयाच्या मधुर मिश्रणीं
कलाकुसर ही हाच करी.

किंवा तरुणींच्या गालांवर
दे भिरकावुन रंग मनोहर
त्या रंगाचा मिलाफ सुंदर
लबाड हा दुरुनीच भरी.

अगाध ऐशी ह्याची करणी
कुंचलिची हातांत मोहिनी
अहोरात्र दे रंग उधळुनी
चमत्कार ह्याच्याच उरीं.

# लोकमान्य

वर्तमान ज्यातें नित्य स्मरे
तो धन्य जया काळ न विसरे.

पोलादाचें अजस्र वेष्टन
काळ बसे भंवतालीं वेढुन
त्यांत ठसा जो ठेवी खोदुन
प्रताप त्याचा अजब ठरे.

देशभक्तिचें नसानसांतुन
ज्याच्या उसळे अखंड जीवन
प्रिय नच कांहीं ज्यातें त्याहुन
लोकोत्तर तो कां न बरें ?

जनतेचा तो प्रचंड सागर
कहर करी उसळतांच क्षणभर
परंतु सत्ता ज्याची त्यावर
धुरीण तो हें मात्र खरें.

भगवंताचें वचन स्फूर्तिकर
मोक्षप्रद उच्चारहि क्षणभर
'रहस्य' त्यांतिल कर्मयोगपर
दे समजावुन पुरेंपुरें.

त्या योध्याला–अमुचें वंदन
वंदनेंच होऊंही पावन
स्मरणांतहि पावित्र्य विलक्षण
चैतन्य दिलें जें तेंच उरे.

# जीवना !

जीवना ! बिलगलों तुला तुला
प्रेमळा, रक्षिसी मला मुला.

झालीं गेलीं अनंत मरणें
विस्मरणच ज्यांचें केवळ स्मरणें
हेतु तुझा त्यांतून तगविणें
क्षणभरी चिराडि जरि काळ खुळा.

वाहत आहे अथांगहि नदी
थांबायाची आतां न कधीं
प्रळयकाळिं तो उदार उदधी
मग स्नेहें कवळिल अपुल्याला.

ह्या ह्या माझ्या सगळ्या शक्ती
दिल्या तोंवरी तुझिया हातीं
छत्र तुझें हें असतां वरती
मी विसरुन जातों सर्व कळा.

प्रचंड झंझावात वाहुं दे
उन्मळुनी वृक्षास टाकुं दे
जग उलथें तिकडे होऊं दे
बघ भार तुझ्यावर सर्व दिला.

# सगळेच चहुंकडे

सगळेच चहुंकडे मानकरी
कुणि त्यांत न चमके धारकरी.
दीड दोन शतकांच्यापूर्वी
जागी स्वातंत्र्याची देवी
आणि अतां त्या तिच्या अभावीं
सोंगें रंगत परोपरी.
मांसहि गेलें हाडहि गेलें
हृदय अगोदर पुढें चाललें
उरले त्यांचे बेडर भाले
बुजविति ते ह्या तळिं विहिरी.
दगड आणि धोंड्यांचे किल्ले
शिर फोडुन त्यांनींहि घेतले
उभे बुरुज तेही ढांसळले
कुठवर धरितिल धीर तरी.
प्रताप ज्यांचे वाचुन अजुनी
चकित दूरचें जग क्षणोक्षणीं
वंशज त्यांचे नट समजोनी
बसती सिंहासनावरी.
वर्तमान जरि जाब विचारि न
भविष्य घेइल कधिं नच परिसुन
आठवेल मग अवघें त्रिभुवन
शापिति तुटक्या तरवारी.

# उत्सवप्रिय हें जग

उत्सवप्रिय हें जग सगळें
देवास खेंचिती त्यांत बळें.

अवघड घण उचलून दिनभरी
श्रमें जीव मिळवितां भाकरी
मिळवायास्तव मना हुशारी
रंग धरा हिरवे पिवळे.

लोखंडाचा फाळ नांगरीं
जमीन काळी भुसभुशित करी
चाबुक बैलाच्या पाठीवरि
झूल त्यास पण त्याचमुळें.

चक्र घरघरे यंत्रामधलें
तेंहि नरमतें वंगणामुळें
कळ धरुनी जे वरती बसले
कंठीं त्यांच्या हार रुळे.

मेख तुक्याची ज्यांच्या हातीं
बुद्धिबळें ते जन नाचविती
स्वर्गांतिल देवास ओढिती
भावना जगाला करी खुळें.

# पिंजारी

कण कण कण पिंजुनियां उभवि शुभ्र राशी
जन म्हणती ' पिंजारी ' या धनुर्धरासी.

उंच आणि सडपातळ
मूर्ति असे फार चपळ
डोळ्यांतच सगळें बळ
बोलणें मिजासी.

नक्षीची वेलबुटी
शोभे टोपीस किती
नाजुक हळुवार कृती
मुरडही विलासी.

तलम मलमली सदरा
जाकिटास जरहि जरा
पायजमा तंग पुरा
म्हणति ' चुडी ' ज्यासी.

उजळ्या खांद्यावरती
धनुकलीं असे तरती
' त्यांव त्यांव ' करुनी ती
भाव कथि जगासी.

तक्के गाद्या गिरद्या
लोड उशा आणुन द्या
मउ अगदीं करुनी घ्या
पिंजुनी तयांसी.

—मग मग त्यांवरति बसुनि
मौज लुटा रुसुनि हंसुनि
क्षणभर जा जग विसरुनि
जें दिसें उदासी.

# कागदा

कागदा ! तुझे सामर्थ्य अफाट
सहचरी तुझी अनुरूप तशांत.
ताम्रपटोद्भव तव जन्मकुळी
वंशवृद्धि ताडपत्राभाळी
प्रताप ज्यांचे प्रभावशाली
जगविले तुवां जुने सम्राट्.
वेदपुराणे ऋषी घोषिती
ऋचा मंत्र तगवाया झटती
साह्य तुझें त्या मिळतां अंतीं
शुद्ध लाभले प्रभुचे पाठ.
झणत्कार मधु सरस्वतीचे
कालिदास भवभूति कवींचें
संस्कृतिप्रिय वाग्भट धीटांचे
सुलभ जगाला अल्प श्रमांत.
इतिहासाचे दुर्गम पर्वत
तुवांच केलें त्यांना शाश्वत
अखंड आचरसी हे सुव्रत
त्रिखंडांत यामुळेंच ख्यात.
प्रिया तुझी पण काभिन्न काळी
तूं गोरा जरि ती तुज उजळी
तिजवांचुन तुज किंमत नच मुळिं
तिच्यामुळें तुज मान जगांत.

# पुणें दरबारीं

शत्रुच्या खंड्या समशेरी
वांकती पुणें दरबारीं
पेशवे मऱ्हाटी स्वारी
तळपती तिखट तल्वारी.

तो वाघ, वाघ म्हैसुरी
कांपतो उरीं
टिपू चौधारी
तळपती तिखट तल्वारी.

चौघडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तल्वारी.

इंग्रजी बावटा धीट
पहा, थरथरत
ऐकतां भेरी
तळपती तिखट तल्वारी.

रणरंग पुण्यांतिल दंग
बांधुनी चंग
घेति ललकारी
तळपती तिखट तल्वारी.

वांकती थोर सरदार
दिल्लिचे वीर
पुणें दरबारीं
तळपती तिखट तल्वारी.

फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फेरी
तळपती तिखट तल्वारी.

केवढी ! पुण्याची भिती
पहा, कांपती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी.

# निःस्पृहता

जगीं दुर्मिळ पोषक निःस्पृहता
निःशंकच ही कटुता कटुता.

अचपळ घोड्यावरती बैठक
हातीं भाला तळपे बोचक
तरळ दृष्टि तरि भेदक शोधक
अंतरीं परंतू कोमलता.

शत्रुमित्र हिचिया भंवतालीं
ही सत्याची सदैव वाली
लाथ हिची दुष्टांच्या भाली
सगळीच तिथें मग निष्ठुरता.

रुचे न हिजला जगीं वावरणें
विजनिं रुचे दिनरात गुंगणें
'सत्यासाठीं जगणें मरणें'—
हा मंत्र हिचा उठतां बसतां.

हिच्यावांचुनी मलीन सगळें
ही येतां जग मोहुन उजळे
फुलुन कला मग डोले डौलें
ये चोहिंकडे नव उज्ज्वलता.

# आकाशदिवा

वरवरति चढे आकाशदिवा
प्रांत तया सगळाच नवा.

उंच उंच हे येथिल इमले
बडेजाव गर्विष्ठ त्यांतले
खिडक्यांमधुनी बघूं लागले
मुंग्यांचा खालती थवा.

निळा मुलामा आकाशावर
चितारला त्या ढगांढगांवर
काचित् लुकलुके तारा सुंदर
पावित्र्याचा गोड दुवा.

पार्श्वभूमिही मोहक ऐशी
जनता पृथ्वीवरी मिजासी
वाऱ्यावरचा दिवा विलासी
भुरळ पाडितो सकल जिवां.

खूप खूप हा जाई वरवर
तोडाया स्वर्गाचें अंतर
मोहतीलही वरचे किन्नर
वाटे हा सगळ्यांस हवा.

अशी ज्योत ही कलाविलासी
नियंत्रणावांचून धाडसी
घोडदौड घे ही वाऱ्याशीं
सुंदर अभिनव देखावा.

# दारिद्य उरावर

दारिद्र्य उरावर घोर सुरी
शक्ति धरेवर ही असुरी.

तरवारींचा वितरो ताफा
गडगडोत त्या अजस्र तोफा
फूत्कारोत विषारी वाफा
तिळभरी न ती हटणार परी.

किती घोर पापांचे पर्वत
पायांखालीं हिच्याच सांप्रत
त्याचमुळें ही अखंड सुस्थित
वचकून भयंकर काळ उरीं.

दूर दरींत बलाढ्य महाजन
पाचोळ्यापरि दे भिरकावुन
थरथरती राष्ट्रेंहि अकिंचन
कुणि घ्याया न धजे शाप शिरीं.

गरिब काय मग टिके हिजपुढें
जीवन ज्यातें असह्य कोडें
कोण अशास्तव संकटीं पडे
त्रिकाळ जधीं ही रूप धरी.

## श्री. भास्करराव तांबे यांस—

बघ ढळला नच दिन—झांकळले
भाद्रपदी ढग—तरंगले.

बाहिर पाउस पडतच राही
पागोळ्यांना उसंत नाहीं
सूर्य कोठुनी दर्शन देई
प्रकाशकिरणच वर दडले.

असाच गांई माझे लाला !
काव्यदेविच्या सुवासिक फुला !
भृंगांचा हा सगळा मेळा
तुझ्याभोंवतीं नित्य डुले.

गार गालिचे तुझ्यासभोंवतिं
मखमालीहुन मऊ हे किती
वेली-तरुवर मुदें डोलती
प्रसन्नता साक्षात झुले.

वाटींत तुझ्या अवघें अमृत
भरुनी वाहे तुझा गोड घट
भिवविशि कां आम्हांतें अवचित
मरण अमर तें—दूर पळे.

# महादजींचें ग्वाल्हेर

पिउन घ्या इथें डोळ्यांनीं ! विभव स्वराज्याचें
नव्या जुन्या आकांक्षांचें: मूर्त कल्पनांचें.

थोर मर्द शिंदा येथें ताठ उभा आहे
जयशाली भगवा झेंडा उंच फडकताहे
तिखट शत्रु थरकापोनी दूर दूर राहे
अभिमानें त्याच्या पुढती लवे शीर माझें.

इथें पडे परमपवित्रा पराक्रमी राणी
इथें स्वर्ग या भूवरती खेंचुन जी आणी
इथें तिची नश्वर काया जातसे मिळोनी
लाख इथें निघतिल: ऐसें चित्र पुढें नाचे.

जवळ उभा बेडर किल्ला, तिच्या पायथ्याशीं
हीच मराठ्यांचीं तीर्थें, हीच त्यांस काशी
उधळिते तिच्यावर 'गुजरी' रोज रत्नराशी
'मानासिंग' लाविल सकलां टिळे केशरांचे.

अजुन इथें झुलती हत्ती त्याच वैभवांत
अजुन जुन्या पोशाखांचा तोच भव्य थाट
अजुन तीच हृदयें जळती, रक्त तेच थेट
धन्य मराठ्यांनों ! इथल्या धनी व्हा यशाचे.

# आई

ये जवळी, मज कवळी, अजुन तरी—आई.
दर्शनास आंचवला
जीव म्हणुन घाबरला
कळवळला तळमळला
अंधारी येई.

आशेचे पंख तरल
मन त्याहुन तें अचपळ
शेवटचें घेउन बळ
तुजकडेच जाई.

येत अशी ही घटिका
या इथेंच—शेवट कां ?
स्पष्टच त्या ये हांका
दुरुन कुणी बाही.

खालिल ही थंड खाट
मज दावी नविन वाट
कर घाई तूं अशात
वेळ मुळीं नाहीं.

आणि अतां बुडुं बघतो
घट फुटका घुटमळतो
पक्षि आंत चुळबुळतो
ज्योत मंद होई.

# बांधितो घरें अपुलीं

बांधितो घरें अपुलीं कोंपऱ्यांत कोळी.

खालींवर खालींवर
वणवण चाले दिनभर
विश्रांती नच क्षणभर
ह्या कधी मिळाली.

सतत ह्यास एक ध्यास
फुकट न दवडीहि श्वास
शक्ति लावितो पणास
वेळहि जर आली.

क्वचित यत्न होत विफल
तुटुनहि जातें घरकुल
सांवरून पुनरपि बळ
जोडितसे जाळीं.

ह्याची पाहून कला
बुद्धिवंत नर पहिला
विणण्या येथें शिकला
म्हणुन आज शाली.

अजुनहि मी तास तास
राहिं उभा सावकाश
मौज ही पहावयास
कितिकदां सकाळीं.

हेंच वेड बाळपणीं
नच सुटलें तें अजुनी
स्मृतिसाठीं मीहि म्हणुनि
लिहित पुन्हां ओळी.

# उंच उंच उंचावर

उंच उंच उंचावर घिरटतें विमान.

ज्ञानेच्छू आंत बसुनि
न्याहळी जगास वरुनि
प्रगतीच्या मार्गावर ने जुनें निशाण.

ललनेसह सहल कुणी
मौज लुटी वर येउनि
हांसेला खालिल जग कितितरी लहान.

धाडशी कुणी नरवर
बाहू ज्याचे कणखर
धोक्यांतहि पंखावर लटकवीत प्राण.

कोणि करी प्राणघात
माखी रक्तांत हात
थरथरते पृथ्वी हें बघुन अशुभ यान.

म्हणुन स्वर्ग पळत पुढें
त्यास न उकले कोडें
स्थिर व्हाया नच गवसे अजुन योग्य स्थान.

सांप्रत ही स्थिति तरती
उन्नति किंवा अवनति
ठरवाया योग्य येत काळ तो महान्.

# प्रभु ! तुझे न अंतरले कधिं पाय

प्रभु ! तुझे न अंतरले कधिं पाय
असो कसाही जरि व्यवसाय.

लावुं शकें नच कधीं समाधी
हातिं न धरिली स्मरणी साधी
बाह्य कर्म वाटल्या उपाधी
तरि बघें तुला ह्यांच्याहिशिवाय.

उसळो गर्दी देवद्वारीं
आंत लुडबुडो तुझे पुजारी
ठेक्यावर नाचोत कथेकारि
दृष्टि न तिकडे माझी जाय.

डोईवरती तुवां दिलें जें
निमुटपणें तें वाहिन ओझें
प्रेमभरें त्या मानुन माझें
तुझी त्यांत मज दिसतें काय.

यांतच मजला लाभे शांती
यांतच आहे भवभय मुक्ती
तुझीच अंतरिं तळपे ज्योती
मी बालक, तूं माझी माय.

हातीं कर्तव्याचा नांगर
कशास तर मग व्हावी कुरकुर
विश्व अम्हांसाठीं हें सुंदर
पदोपदीं मज तुझें सहाय्य.

# कवितेप्रत

कविते ! जांई दूर भरारा, मीहि फिरें माघारा

पूर्वसुखाचें चित्र रंगवुनि
हरघडि दृष्टीपुढें कोरुनी
घालिसी फिरुनी फिरुनि मोहिनी
रचुनि मनोहर कारा
कविते ! जांई दूर भरारा.

वस्तु छाया भिन्न जरि कळे
विश्व विलासामधें रंगलें
ढग अश्रूंचे दाट पसरले
ये डोळ्यांवर सारा
कविते ! जांई दूर भरारा.

पाठीवरति वयाचें ओझें
आपुलकीनें म्हणतो माझें
सार्थ किती हें नच मज उमजे
झाला गोंधळ सारा
कविते ! जांई दूर भरारा.

दृष्टी वळली दक्षिणेकडे
कोठें अवसर वळण्या हिकडे
चिंतेनें मन होई वेडें
दिसतो जवळ किनारा
कविते ! जांई दूर भरारा.

एका गोलावर जरि आपण
स्थिर तूं अस्थिर माझें जीवन
हातीं झरती मौल्यवान क्षण
डळमळतो डोलारा.
कविते ! जांई दूर भरारा.

REFBK-0004930
REFBK-0004930

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

—श्रीगीतोपनिषत्सु श्रीभगवान् ।

४८३०
१७६